RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५५ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१३ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# संसदेच्या सुरक्षेत गंभीर चूक, प्रेक्षक गॅलरीतून लोकसभेच्या सभागृहात दोन जणांनी मारली उडी

## सभागृहात स्मोक कँडल पेटवल्या ; लातूर आणि हरियाणा मधील दोघांना अटक

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**





संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेतील सुरक्षेमध्ये गंभीर चूक घडली असून, आज लोकसभेचे कामकाज सुरू असताना प्रेक्षक गॅलरीमधून दोन जणांनी सभागृहात उडी मारली. तसेच या दोघांनी सभागृहातील बेंचवर उड्या मारून गोंधळ घातला. त्याबरोबरच त्यांनी सभागृहात स्मोक कँडल पेटवल्या. दरम्यान, या दोघांनाही पकडण्यात यश आले असून, त्यांची चौकशी सुरू आहे. मात्र या प्रकारामुळे खळबळ उडाली असून, लोकसभेचे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले आहे.

मिळत असलेल्या प्राथमिक माहितीनुसार तीन जणांनी संसद भवन परिसरामध्ये गोंधळ घातला असून, त्यांच्यामध्ये एका महिलेचाही समावेश आहे. यापैकी दोघांनी लोकसभेच्या प्रेक्षक गॅलरीमधून सभागृहात उड्या मारल्या. तसेच त्यांनी सभागृहातील बाकांवर उड्या मारून अध्यक्षांच्या आसनाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला. तसेच सभागृहात स्मोक कँडल पेटवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, संसदेत गोंधळ घालणाऱ्या तरुणाचं नाव सागर असल्याचे समोर आले आहे. तर संसदेबाहेर स्मोक कँडल पेटवणारा अमोल शिंदे हा तरुण महाराष्ट्रातील लातूर येथील असल्याचे समोर येत आहे. तसेच त्याच्यासोबत असलेल्या महिलेचं नाव नीलम सिंह आहे.

याबाबत माहिती देताना काँग्रेस खासदार अधीररंजन चौधरी यांनी सांगितले की, दोन तरुणांनी प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात उड्या मारल्या. त्यांनी काही वस्तू फेकल्या. त्यातून धूर येत होता. मात्र या तरुणांना खासदारांनी पकडले आणि सुरक्षारक्षकांच्या ताब्यात दिले. संसदेच्या सुरक्षेमधील ही गंभीर चूक आहे असा आरोपही अधीररंजन चौधरी यांनी केला. दरम्यान, आज १३ डिसेंबर रोजी संसदेवर झालेल्या हल्ल्याला २२ वर्षं पूर्ण झाली आहे. त्याच दिवशी लोकसभेत हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.

**तो धूर विषारी असता तर**

काँग्रेस खासदार कार्ती चिदंबरम यांनी सभागृहात घडलेला प्रसंग कथन केला. ते म्हणाले, दोन लोकांनी प्रेक्षक गॅलरीतून लोकसभा सभागृहात उडी मारली. त्यांच्या हातात कॅन होते. त्यातून पिवळा धूर येत होता. दोघांपैकी एक जण अध्यक्षांच्या आसनापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. दोघेही काहीतरी घोषणा देत होते. पण त्या मला समजू शकल्या नाहीत. पण दोन लोक सुरक्षा भेदून आतमध्ये येतात, सभागृहात उड्या मारून धूर सोडतात, याला काय म्हणायचे. कदाचित हा धूर विषारीही असला असता किंवा स्मोक बॉम्बही असू शकला असता. आजच्या दिवशीच १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर हल्ला झाला होता. त्यामुळे याच दिवशी पुन्हा अशाप्रकारे घुसखोरी होणे, हे खूपच गंभीर आहे.

## लोकसभेच्या घटनेचे नागपुरात पडसाद विधानपरिषदेत अभ्यागतांना प्रवेश बंद

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपुर**

लोकसभेतील गॅलरीतून सभागृहात शिरत गोंधळ घालण्यात आल्याच्या घटनेचे पडसाद महाराष्ट्राच्या विधिमंडळात देखील उमटले आहेत. विधान परिषदेच्या गॅलरीत या अधिवेशनात अभ्यागतांना प्रवेश देऊ नये असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत.

दरम्यान ही घटना कारणावर आल्यानंतर सभागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेचा तत्काळ आढावा घेण्यात आला. तसेच उपस्थित सुरक्षा रक्षकांना कडेकोट तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही घटना गंभीर आहे. विधानपरिषदेतील



गॅलरी पासेस आजपासून बंद करण्यात येत आहेत. अभ्यागतांना सभागृह गॅलरीत प्रवेश मिळणार नाही. आमदारांनी पासेसबाबत पत्र जारी करू नये असे निर्देश उपसभापतींनी दिले.

## लातुरात पोलिसांच्या हालचाली; महाराष्ट्रातील घुसखोराबाबत कळताच फडणवीसांचा पोलीस महासंचालकांना फोन

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

संसदेवरील दहशतवादी हल्ल्याला आज २२ वर्षे पूर्ण झाली. याच दिवशी लोकसभेत आज दोन घुसखोरांनी प्रेक्षक गॅलरीतून उड्या मारत स्मोक कँडल फोडले. यामुळे संसदेतील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून खासदारही भितीच्या छायेत दिसत होते. अशातच संसदेबाहेर स्मोक कँडल फोडणाऱ्यांमध्ये महाराष्ट्राचा तरुण होता. यामुळे महाराष्ट्रातील पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून लातुरात पोलिसांच्या हालचाली वाढल्या आहेत.



संसदेतील या घुसखोरीच्या घटनेचे पडसाद नागपुरमधील हिवाळी अधिवेशनातही उमटले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या घटनेची माहिती सभागृहात दिली. तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांना फोन करत या तरुणाची माहिती काढण्याचे आदेश दिले आहेत.


हा तरुण कुठे राहतो, तो काय करतो, त्याची सोशल मीडियातील उपस्थिती, यामागचा उद्देश आदी गोष्टींची माहिती घेण्यास फडणवीसांनी सांगितले आहे. यानंतर लातुरात खळबळ उडाली असून चाकूर झरी गावतील अमोल शिंदे याने संसदेबाहेर स्मोक कँडल फोडले होते. त्याच्या घरी लातूर पोलिसांचे पथक निघाले आहे. अमोल शिंदे याचे कोणी नातेवाईक तिथे राहतात का? तो कोणत्या शहरात वास्तव्यास आहे आदीची माहिती हे पोलीस गोळा करणार आहेत.

आतापर्यंत चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. यापैकी तिघे हे उत्तर भारतातील आहेत, तर अमोल हा महाराष्ट्रातील आहे. या लोकांशी अमोलचा संबंध कसा आला, तो कोणत्या संघटनेशी संबंधीत आहे का आदी गोष्टींचा तपास करण्याची जबाबदारी आता लातुर पोलिसांवर आली आहे.

## तानाशाही नहीं चलेगी, संसदेतील घटनेनंतर ताब्यात घेतलेल्या महिलेने केली घोषणाबाजी, नेमका रोख कोणावर?

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नवीदिल्ली**

संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरू असताना लोकसभेत आज अचानक गोंधळ झाला. खासदार शुन्य प्रहारात आपलं म्हणणं मांडत असताना प्रेक्षक गॅलरीतून एका तरुणाने उडी मारून पिवळ्या रंगाचा धूर सोडला. यामुळे सभागृहात एकच गदारोळ झाला. या प्रकारानंतर संसदेच्या सुरक्षेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. दरम्यान, या घटनेत दोघांना ताब्यात घेण्यात आलं असून त्यातील एका महिलेने संसद परिसरात घोषणाबाजी केली.



संसदेत घडलेल्या घटनेप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं. नीलम (४५) आणि अमोल शिंदे (२५) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. यांना ताब्यात घेतल्यानंतर दोघांनीही मोठ्या घोषणा केल्या. तानाशाही नहीं चलेगी (हुकुमशाही नाही चालणार.) मणिपूरबाबत न्याय द्या. महिलांवरील अत्याचार नाही चालणार. भारत माता की जय, हुकुमशाही बंद करा. जय भीम, जय भारत, महिलांवरील अत्याचार नाही चालणार. वंदे मातरम. अशा घोषणा या दोघांनी केल्या.याप्रकरणी चौकशी सुरू करण्यात आली आहे. हा प्रकार कोणी आणि कोणत्या उद्देशाने केला याची चौकशी केली जाईल. या घोषणाबाजीत मणिपूरचा उल्लेख असल्याने त्यादृष्टीनेही चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. दिल्ली पोलीस आयुक्त संजय अरोरा हेसुद्धा घटनेनंतर संसदेत दाखल झाले होते.

## सुनावणी संपण्यापूर्वीच राहुल नार्वेकर अध्यक्षपदाचा राजीनामा देतील; रोहित पवारांचा दावा

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



रोहित पवारांनी अजित पवारांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. अजित पवारांनी विधानसभेत पीएचडी करून काय दिवे लावणार आहेत, असे खोचक वक्तव्य केले होते. यावर रोहित पवार यांनी पीएचडीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत केलेले विधान चुकीचे आहे, असे म्हटले आहे. तसेच मिटकरींच्या आयुष्यातील घोळ सांगितले तर त्यांना तोंडही दाखविणे कठीण जाईल असा इशाराही दिला आहे. याचबरोबर आमदार अपात्रतेच्या सुनावणीवरही रोहित पवारांनी मोठा दावा केला आहे.

माझ्यावर लाठीहल्ला झाला असे मी कुठेही बोललो नाही. माझे देखील कपडे तिथे फाटले होते. एखाद्या कार्यकर्त्यावर हल्ला झाला, तर तो नेत्यावरही होतो. मिटकरींना एवढे महत्व का देता? त्यांचा पराक्रम काय तो कळेल? सामान्य लोकांसाठी केलेले आंदोलन, तुम्हाला स्टंट वाटत असेल तर तुम्हाला सामान्य लोकांबद्दल तुम्हाला काही वाटत नाही, असा त्याचा अर्थ होतो, अशी टीकाही रोहित पवारांनी केली.

युवकांना मदत करणे ही सरकारची जबाबदारी आहे. युवांना संधी देण्याची जबाबदारी सरकारची आहे. अजित पवार यांच्या वक्तव्याचा मी निषेध करतो. श्रीमंताचा मुलगा पीएचडीसाठी पैसे मागायला सरकारकडे का येईल, ही शेतकऱ्यांची, गरीबांची मुले आहेत. पीएचडीसाठी जो वेळ लागतो, त्यासाठी या मुलांकडे पैसे नाहीएत. मुलांकडे क्षमता आहे, बुद्धिमत्ता आहे. पण पैसा नाही, म्हणून ही मुलं सरकारच्या स्कॉलरशीपवर शिकत असतील. तर त्यात काहीही चूक नाही. त्यावर कुणी शंका घेऊ नये, असे रोहित पवार म्हणाले.

फक्त शिंदे गटाचे नाही तर अजित पवार गट मित्र मंडळाला देखील भाजप चिन्हावर लढाव लागेल, अशी टीका रोहित यांनी केली. हे पक्ष एवढ्या जागा मागतील की भाजपच त्यांना म्हणेल की आमच्या चिन्हावर लढा नाहीतर आमच्याकडे पर्याय आहेत. यानंतर या लोकांना दुसरा पर्याय राहणार नाही, असा इशारा रोहित यांनी दिला.

## आरोग्य खात्याच्या कारभारावरून विरोधकांचा सभात्याग; मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

### दोन महिलांचा डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचाही आरोप

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

गडचिरोली व बुलढाणा येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात प्रसूतीदरम्यान दोन महिलांचा मृत्यू झाला.याला आरोग्य खात्याचा हलगर्जीपणा कारणीभूत असून आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी राजीनामा द्यावा,अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली.

आरोग्य विभागाच्या कारभाराचा निषेध करून दोषींवर कडक कारवाईची मागणी करत वडेट्टीवार यांच्यासह विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला .विधानसभेत प्रशोत्तराच्या तासादरम्यात झालेल्या चर्चेत वडेट्टीवार यांनी आरोग्य विभागाचे वाभाडे काढत जोरदार हल्लाबोल केला.गडचिरोली शहरातील जिल्हा स्त्री व बालरूग्णालयात सिझेरियन प्रसुतीनंतर रजनी प्रशांत शेडमाके व उज्वला नरेश बुरे या दोन महिलांचा डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला असा आरोप त्यांनी केला. त्याचसोबत बुलढाणा येथील जिल्हा स्त्री रुग्णालय व अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालय या दोन्ही ठिकाणी उपचारासाठी आलेल्या विद्या निलेश गावंडे या तरुणीचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला.या प्रकरणी कडक कारवाईची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

## आदित्य ठाकरेंचा पासपोर्ट जप्त करा, नीतेश राणे यांची मागणी

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

दिशा सालियान प्रकरणात एसआयटी गठित करण्यात आली आणि त्यात तीन अधिकाऱ्यांचा तपास अधिकारी म्हणून समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी आदित्य ठाकरे परदेशात पळून जाण्याची शक्यता आहे. त्यांच्याविरोधात लूक आउट नोटीस जाहीर करून त्यांचा पासपोर्ट जप्त करण्यात यावा अशी मागणी आमदार नीतेश राणे यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी बोलताना केली.

सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीतून सगळी सत्यता बाहेर येईल. आपला मुलगा आरोपी असल्याने उद्धव ठाकरे त्यांचा बचाव करीत आहे. दिशा सालियान आणि सुशांतसिंग राजपूत यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे, असे राणे म्हणाले. मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपपत्र देण्यास विरोध आहे. ज्यांच्याकडे नोंदी आहेत त्यांनाच देण्यात यावे. रोहित पवार यांच्या मोर्चावर झालेला लाठीमार नियोजित होता, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## ‘हो, मनोज जरांगेंना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले’ ; मुख्यमंत्री शिंदेंची सभागृहात माहिती

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यात गाजत असलेल्या मराठा आरक्षणाबाबत आतापर्यंतची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठीचं उपोषण सरकारच्या ठोस आश्वासनानंतर सुटले काय?, या प्रश्नाला लेखी उत्तरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'होय हे खरे आहे' असे सांगितले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सरसकट कुणबी प्रमाणपत्राचा मुद्दा ऐरणीवर येतांना दिसतोय. विशेष म्हणजे सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याचे एकीकडे मुख्यमंत्री यांच्याकडून सांगण्यात येत आहे. तर, दुसरीकडे मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीला मंत्री छगन भुजबळ यांनी विरोध केला आहे.



मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्याकडून उपोषण करण्यात आले. यासाठी त्यांनी आंतरवाली सराटी गावात उपोषण सुरु केले होते. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आश्वासनानंतर त्यांनी आपले उपोषण मागे घेतले. विशेष म्हणजे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन देण्यात आल्याची लेखी माहिती खुद्द आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून देण्यात आली आहे. हिवाळी अधिवेशनात सभागृहात विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी ही कबुली दिली आहे.

## संपादकीय ......

# नवाब मलिकांवरुन महायुतीत महाभारत ?

हिवाळी अधिवेशनाचा पहिला दिवस अनेक कारणांनी चर्चेत राहिला. त्यातलं आणखी एक कारण ठरले माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक. मविआ सरकार बनत असताना आणि सत्तेत आल्यावर ज्यांनी किल्ला लढवला, भाजपवर अखंड तुटून पडण्यात संजय राऊत यांच्यासोबत नवाब मलिक सुद्धा हे नाव सुद्धा अग्रेसर होतं. त्यामुळे भाजपने सुद्धा मलिकांवर हल्ले करणं सोडलं नाही. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात नवाब मलिक यांना ईडीने अटक केली, जवळपास दीड वर्ष ते तुरुंगात होते. देशद्रोह्यांशी, मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींशी, दाऊद इब्राहीमशी–अंडरवर्ल्डशी संबंध असल्याचे आरोप त्यांच्यावर झाले. नवाब मलिकांच्या पैशाचा ट्रेल, टेरर फंडिंगचा अँगल त्यावेळी विरोधी पक्षात असलेल्या देवेंद्र फडणवीसांनी अत्यंत पोटतिडकीने महाराष्ट्राला समजावून सांगितला होता.

चारच महिन्यापूर्वी नवाब मलिक तब्येतीच्या कारणावरुन अंतरिम जामिनावर बाहेर आले. मधल्या काळात राज्यात बऱ्याच उलथापालथी झाल्या. अजितदादांनी वेगळी चूल मांडत भाजपसोबत घरोबा केला अन् थेट सरकारमध्ये सहभागी झाले. त्यामुळे नवाब मलिक दादांसोबत की काकांसोबत हा प्रश्न विचारला जाऊ लागला. त्याचं क्लिअर कट उत्तर आज मिळालं. देशद्रोह्यांशी संबंध असल्याचा...टेरर फंडिंग केल्याचा आरोप असलेले नवाब मलिक हिवाळी अधिवेशनात थेट सत्ताधारी बाकांवर दिसले. काही महिन्यापूर्वी मलिकांची पाठराखण करणारी उद्धव ठाकरे गटातील नेते मलिकांवर टीका करताना दिसले. तर मलिकांच्या टेरर फंडिगचं गणित महाराष्ट्राला समजावून सांगणारे देवेंद्र फडणवीस आज मलिकांमुळे होत असलेल्या टीकेला उत्तर देताना दिसले.

आपल्या राजकारणाची सध्याची परिस्थिती पाहिली की – आतले आणि बाहेरचे – या धड्याचीच आठवण येते. राणेंपासून, विखेंपर्यंत, वाघांपासून राठोडांपर्यंत आणि शिंदेंपासून पवारांपर्यंत अनेक नेते जोवर भाजपच्या बाहेर होते तोवर त्यांची भाजपबद्दल आणि भाजपची त्यांच्याबद्दल काय भाषा, काय विचार होते.. आणि ज्याक्षणी ते भाजपमध्ये किंवा भाजपसोबत आले तत्क्षणी सगळ्यांचीच भाषा, विचार कसे बदलले ते आपण पाहात आहोत. तीच गोष्ट आज नवाब मलिकांच्या बाबतीत होताना दिसत आहे. कालपर्यंत मलिकांवर थेट देशद्रोह्यांशी संबंध आहेत म्हणून आरोप भाजपने, फडणवीसांनी केले, आज त्याच मलिकांबाबत फडणवीसांना सभागृहात उभं राहून बोलावं लागलं. त्यामुळे आज आदित्य ठाकरेंच्या एसआयटीची मागणी केली जात आहे पण उद्या आदित्य भाजपसोबत आलेच तर हे चित्र तीनशे साठ (३६०) अंशात बदलणारच नाही याची गॅरंटी कोणीही देऊ शकत नाही.

'आतले' हे वर्तमानकाळावर स्वार असतात तर 'बाहेरचे' हे भविष्याकडे आशाळभूतपणे पाहात असतात. सर्वसाक्षी निसर्ग आपल्या गूढ प्रेरणेप्रमाणे या बाहेरच्यांचे आतल्यात आणि आतल्यांचे बाहेरच्यात रुपांतर करण्याचा खेळ अखंड खेळत असतो, असं करंदीकर का म्हणतात त्याचा अंदाज आपल्याला राज्यातील सध्याचं राजकारण पाहून येऊ शकतो. आतले कधी बाहेरचे होतात, बाहेरचे कधी आतले होतात या खेळाकडे आपलं लक्ष असणार आहे.

# गोठलेला खांदा



*गोठलेले खांदा म्हणजे काय?गोठलेले खांदा ही अशी स्थिती आहे ज्यामुळे खांदा दुखतो आणि खांदा कडक होतो आणि शेवटी हात आणि खांदा हलवणे कठीण होते.गोठलेले खांदाचा विकास हळूहळू तीन टप्प्यांत होतो आणि प्रत्येक टप्पा अनेक महिने टिकू शकतो. तथापि, ते लवकर बरे देखील होऊ शकते.*

*गोठलेले खांद्याची कारणे काय आहेत?असे अनेक घटक आहेत जे तुम्हाला गोठलेले खांदा वाढण्यास अधिक संवेदनाक्षम बनवू शकतात.वय आणि लिंग: हे सहसा ४० वर्षांपेक्षा जास्त स्त्रियांमध्ये दिसून येते.अचलता: जर तुमचा हात अडकवलेले असेल किंवा अन्यथा दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ स्थिर असेल, इजा, शस्त्रक्रिया किंवा स्ट्रोकमुळे, तुम्हाला गोठलेले खांदे विकसित होऊ शकतात.रोग: मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी विकार, क्षयरोग, हायपो थायरॉईडीझम, हायपरथायरॉईडीझम, पार्किन्सन रोग, इत्यादींमुळे तुम्हाला ही स्थिती वाढण्याचा धोका असतो.*

*गोठलेले खांद्याची वाढ कशी होते?खांद्याचा कडकपणा सामान्यतः हळूहळू आणि तीन टप्प्यांत विकसित होतो. यातील प्रत्येक टप्पा अनेक महिने टिकू शकतो.वेदनादायक अवस्था: या टप्प्यात, तुमच्या खांद्याच्या कोणत्याही हालचालीमुळे वेदना होतात आणि तुमची खांदा हलवण्याची क्षमता मर्यादित होऊ लागते. हा टप्पा ३ ते ९ महिन्यांपर्यंत असतो.गोठलेला टप्पा: या टप्प्यात वेदना कमी होऊ शकतात. तथापि, तुमचा खांदा कडक होतो आणि तुमचा खांदा हलवण्याची क्षमता लक्षणीयरीत्या कमी होते. हा टप्पा ४ ते १२ महिन्यांपर्यंत असतो.विरघळण्याची अवस्था: वितळण्याच्या अवस्थेत, आपल्या खांद्याची हालचाल करण्याची क्षमता सुधारू लागते. यास १२ ते ४२ महिने लागू शकतात.*

*गोठलेले खांद्याची निदान कसे करावे?डॉक्टर सामान्यतः शारीरिक तपासणीद्वारे गोठलेल्या खांद्याचे निदान करतात जे तुमच्या खांद्याने परवानगी दिलेल्या हालचालींची श्रेणी आणि तुम्हाला अनुभवत असलेल्या वेदनांचे परीक्षण करते. एमआरआय आणि एक्स–रे सारख्या इतर चाचण्या या निदानाची पुष्टी करतात आणि येऊ घातलेला हृदयविकाराचा झटका (डाव्या खांद्याचे दुखणे हे सहसा लक्षण मानले जाते), संधिवात, रोटेटर कफमध्ये अश्रू येणे आणि टेंडोनिटिस यासारख्या इतर रोगांना नकार देतात.*

*गोठलेल्या खांद्यावर उपचारसर्वप्रथम, खांद्यामध्ये जडपणा असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका आणि चांगल्या फिजिओथेरपिस्ट किंवा अस्थिरोग तज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधा. ते प्राथमिक तपासणी करतील आणि तुमचे खांदे दाबून आणि फिरवून वेदना बिंदू शोधतील. यानंतर, ते आवश्यकतेनुसार रक्त तपासणी, एक्स–रे, एमआरआय इत्यादी चाचण्या देखील विचारू शकतात.औषधे: जर वेदना सुरुवातीच्या टप्प्यावर असेल, तर डॉक्टर वेदनाशामक औषधांनी ते नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतील.स्ट्रेचिंग आणि व्यायाम: सौम्य वेदना झाल्यास, डॉक्टर तुम्हाला काही विशेष प्रकारचे स्ट्रेचिंग आणि व्यायाम करण्याचा सल्ला देतील जे तुम्ही घरी बसून सहज करू शकता.फिजिओथेरपी: जर वेदना थोडी तीव्र असेल आणि हालचाल मर्यादित असेल, तर डॉक्टर तुम्हाला एखाद्या चांगल्या फिजिओथेरपिस्टचा सल्ला घेऊ शकतात, जो केवळ फिजिओथेरपीच्या मदतीने तुमची वेदना बरा करू शकतो. तथापि, यास वेळ लागू शकतो.उष्मा आणि कोल्ड थेरपी: जर तुम्हाला दुखापतीमुळे ही वेदना होत असेल तर कोल्ड थेरपीचा सल्ला दिला जाऊ शकतो आणि जर ही वेदना दीर्घकाळ टिकून राहिली तर तुम्हाला उष्मा थेरपीचा सल्ला दिला जाऊ शकतो. हे डॉक्टरांनी तपासल्यानंतरच, तुम्हाला कोणत्या प्रकारची थेरपी घ्यायची आहे ते ठरवा.कॉर्टिकोस्टेरॉइड इंजेक्शन: तीव्र वेदना झाल्यास, डॉक्टर स्थानिक भूल देतात आणि कॉर्टिकोस्टेरॉइड इंजेक्शन थेट खांद्यावर देतात, ज्यामुळे वेदनांपासून बराच आराम मिळतो.शस्त्रक्रिया: अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये, शस्त्रक्रिया, ज्याला आर्थ्रोस्कोपी देखील म्हणतात, आवश्यक असू शकते.गोठलेल्या खांद्याचा त्रास एका दिवसात कमी होत नसला तरी सुरुवातीलाच लक्ष देऊन योग्य ती पावले उचलली जाऊ शकतात आणि जीवनशैलीत बदल करूनच तो बरा होऊ शकतो.*



**– डॉ. योगेश भीमराव राठोड**
एमबीबीएस एमएस (ओर्थो) डीएनबी (ओर्थो)
एम.एन.ए.एम.एस, एफ.आय.आय.एस एफ.
आय.जे.आर (मुंबई)
बख्तार हॉस्पिटल राजापेठ अमरावती.

# 'मेळघाट हाट': अमरावती शहरात आधुनिक 'मेळघाट हाट' मॉल सुरू

## मॉलला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** सातपुडा पर्वत रांगेत वसलेल्या मेळघाटात आता 'मेळघाट हाट' नावाचा अत्याधुनिक मॉल सुरू झाला आहे. या मॉलमध्ये आदिवासी महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंसह गहू, कोदो, कुटकी, दुग्धजन्य पदार्थ, कॉफी, स्ट्रॉबेरी, मध, यांच्यासह विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळं मेळघाटातील आदिवासी बांधवांना आर्थिक फायदा होणार आहे. त्यामुळं या मॉलला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

जंगलातील अतिशय शुद्ध 'मध' प्रत्येकाला हवा असतो. मात्र तो प्रत्येक ठिकाणी मिळण्याची शक्यता नसते. तसंच मेळघाटात अतिशय दर्जेदार गहू सातपुडा पर्वत रांगेत येतो. राज्यातील एकमेव कॉफीचं उत्पादन देखील मेळघाटातील चिखलदऱ्यात होतं. यासह स्ट्रॉबेरीचं उत्पादन देखील मेळघाटात घेतलं जातं. दुधाचा दर्जेदार खवा, रानमेवा मेळघाटाची खास ओळख आहे. मेळघाटातील या सर्व वस्तूंचं महत्त्व अनेकांना महिती आहे. मात्र, त्यासाठी मेळघाटात जाणं सर्वांना शक्य नसतं. त्यामुळं अनेकजण या शुद्ध पदार्थांपासून वंचित राहतात.



त्यामुळचं मेळघाटात 'मेळघाट हाट' मॉलची संकल्पना साकारण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या सायन्स कोर मैदानालगतच महिला आर्थिक विकास महामंडळद्वारे हा मॉल सुरू करण्यात आला आहे. या मॉलची बांधणी अतिशय सुंदर असून या मॉलमध्ये प्रवेश केल्यावर आदिवासी संस्कृतीचं दर्शन घडतंय. 'मेळघाट हाट'मध्ये असणाऱ्या सर्वच वस्तू आदिवासी बांधवानी तयार केल्या आहेत. या वस्तू बांबूपासून तयार करण्यात आल्या असून त्या खास आकर्षण ठरत आहेत. डायनिंग टेबल, सोफा सेट, भिंतीवरील घड्याळ, आकर्षक फुलदाणी, लाकडी साहित्यापासून तयार करण्यात आलेली खेळणी, महिलांच्या शृंगारसाठी हेअर पिन क्लचर अशा सर्वच वस्तू या ठिकाणी उपलब्ध आहेत.या संदर्भात बोलताना आमदार यशोमती ठाकूर म्हणाल्या की, या मॉलमुळं आदिवासी महिलांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहे. तसंच ग्राहकांना देखील चांगल्या वस्तू मिळणार आहेत. त्यामुळं आदिवासी संस्कृतीचं देखील जतन होणार आहे. यशोमती ठाकूर अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना त्यांनी यासंदर्भात 'मेळघाट हाट'ची संकल्पना मांडली होती. मेळघाटातील महिला बचत गटांना रोजगार उपलब्ध व्हावा, हा त्यामागचा उद्देश होता. आज मेळघाटात २ हजार ३५० पेक्षा अधिक महिला बचत गट आहेत. या बचत गटांना २५ हजाराहून अधिक महिला जोडल्या आहेत. या बचत गटांच्या माध्यमातून मेळघाटात विविध वस्तू तयार करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे या बचत गटाच्या माध्यमातून महिलांद्वारे गांडूळ खत निर्मिती देखील केली जात आहे. मेळघाटातील गांडूळ खत हे अतिशय दर्जेदार असून शेतीसाठी फायदेशीर ठरत आहे. गांडूळ खतासह बचत गटांनी तयार केलेल्या सर्वच वस्तूंना शहरी भागात प्रचंड मागणी आहे.

# सातबारा व फेरफार नोंदी मिळणार ई-सेवा केंद्रात

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** महसुल विभागाची सेवा अधिकाअधिक लोकाभिमुख होण्यासाठी शासनाने ई–हक्क प्रणाली सुरु केली आहे. त्यानुसार सातबारा तसेच फेरफार नोंदीसाठी तलाठी यांच्याकडे जाणाची आवश्यकता नसून गावातच आपले सरकार सेवा केंद्रावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी दर्यापूर उपविभागातील दर्यापूर व अंजनगाव सुर्जी तालुक्यातील नागरिकांनी ई–हक्क प्रणालीचा वापर करावा, असे आवाहन दर्यापूर उपविभागीय अधिकारी यांनी केले आहे.तलाठी कार्यालयातून मिळणारे कागदपत्रे सातबारा, ८अ, तसेच अनोंदणीकृत नोंदी जसे वारसानोंदी, वाटणीपत्र नोंदी, मयताचे नाव कमी करणे, हक्कसोड लेख, बोजा चढविणे, बोजा कमी करणे अशा स्वरुपांच्या नोंदी सातबारा अभिलेखामध्ये करण्यासाठी तलाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही. केवळ २५ रुपयांमध्ये ई–सेवा केंद्र, महाऑनलाईन सेतु सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्राद्वारे सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

महसुली सेवा अधिकाअधिक लोकाभिमुख होण्यासाठी विविध उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. शेतकरी आता त्यांचा सातबारा, ८अ, प्रॉपर्टी कार्ड, शेताचा नकाशा एका क्लिकवर मोबाईलवरच उपलब्ध होत आहे. यातील पुढचे पाऊल म्हणजे राज्यशासनाने ७/१२, ८अ मिळविण्यासाठी तसेच फेरफार करण्यासाठी कागदपत्रे तलाठी यांचेकडे घेऊन जाण्याची आवश्यकता नसून आपले गावात उपलब्ध असलेल्या सेतु सुविधा केंद्रात अर्ज करून मिळू शकतो. यासाठी अर्जदाराने ई–हक्क प्रणालीमार्फत आपली कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. स्वत:चा मोबाईल क्रमांक, उपलब्ध असल्यास ई–मेल आयडी द्यावा लागतो. जेणेकरून आपले स्वत:चे मोबाईलवर आपल्या अर्जाची काय स्थिती आहे?, कुठे प्रलंबित आहे?, अर्जावर निर्णय झाला का? या सर्व स्थिती एसएमएसद्वारे मोबाईलवर प्राप्त होणार आहे. ई–हक्क प्रणालीमुळे नागरिकांना तलाठी कार्यालयात चकरा मारण्याची गरज पडणार नसून सर्व कामे वेळेत होणार आहे. तरी नागरिकांनी ई–हक्क प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा.




## जेवणानंतर गोड खाण्याची इच्छा का होते? यामागचं कारण माहितंय?

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक–** जेवल्यानंतर अनेकांना मिठाई खाण्याची इच्छा असते. एवढंच काय तर लग्न किंवा पार्टीमध्ये गेल्यावर मिठाईचा स्टॉल सर्वात शेवटी का असतो? याचा तुम्ही विचार केला आहे का? हॉटेलमध्ये जेवायला गेल्यावर वेटर्सही तुम्हाला शेवटी स्वीट्स काय खाणार असं विचारतात? हे का घडतं याचं कारण तुम्हाला माहीत आहे का? जेवल्यानंतर काहीतरी गोड खाण्याची इच्छा असणे, अगदी सामान्य गोष्ट आहे. पण यामागील विज्ञान फार कमी लोकांना माहिती आहे. जेवणानंतर मिठाई खाण्यामागचं खरे शास्त्रीय कारण जाणून घ्या.



**जीभेवरील पेशी संतुलित करण्यासाठी–** चविष्ट जेवणानंतर जिभेवरील स्वाद पेशी संतुलित करण्यासाठी मिठाई खाण्याची इच्छा निर्माण होते. याशिवाय कार्बोहायड्रेट्स आणि प्रोटीन्स युक्त अन्न खाल्ल्याने सुस्ती जाणवते, अशावेळी गोड पदार्थ खाल्ल्याने शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. त्यामुळे स्वीट क्रेविंग्स होते.

**रक्तातील साखरेचं संतुलन–**जेव्हा एखादी व्यक्ती ब्रेड, पास्ता किंवा भात यासारखे कार्बोहायड्रेट खातो, तेव्हा शरीर त्यांचे ग्लुकोजमध्ये विघटन करते आणि आपले शरीर इन्सुलिन तयार करते. अशा परिस्थितीत जेव्हा आपण जास्त प्रमाणात कार्बोहायड्रेट खातो, तेव्हा आपले शरीर आवश्यकतेपेक्षा जास्त इंसुलिन तयार करू शकते, ज्यामुळे रक्तातील साखर झपाट्याने घसरते. अशा वेळी, रक्तातील साखर कमी झाल्यामुळे, गोड खाण्याची लालसा वाढते ज्यामुळे रक्तातील साखर सामान्य होते.

**हार्मोन्सचा परिणाम–** जेवणानंतर स्वीट खाण्याची इच्छा होणे, हा शरीरातील हार्मोन्सचाही परिणाम आहे. मिठाई खाल्ल्याने मन प्रसन्न होते. जेव्हा आपण काही गोड खातो, तेव्हा आपला मेंदू (ढीरळप) डोपामाइन नावाचे रसायन सोडतो ज्यामुळे आपल्याला आनंद मिळतो. आपल्या मेंदूला आनंद मिळविण्यासाठी मिठाई खाण्याची इच्छा निर्माण होते.

# आधार अपडेट करण्याची मुदत पुन्हा वाढवली, पुढच्या वर्षीच्या १४ मार्च पर्यंत करू शकता मोफत अपडेट

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** ज्यांना आधार कार्ड अपडेट करायचं आहे त्यांच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटीने आधार कार्ड मोफत अपडेट करण्याची मुदत पुन्हा एकदा वाढवली आहे.

मोफत आधार अपडेट करण्याची अंतिम मुदत १४ डिसेंबर रोजी संपत होती. ती आता १४ मार्चपर्यंत वाढवण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.

आधार प्राधिकरण UID-I ने अधिकृत अपडेटमध्ये मुदत वाढवण्याची माहिती दिली. प्राधिकरणाने सांगितले की, नागरिकांकडून मिळालेला सकारात्मक प्रतिसाद पाहता आधार अपडेटची मुदत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता १४ मार्च २०२४ पर्यंत कोणतेही शुल्क न भरता चू -adhaar पोर्टलद्वारे आधार अपडेट केले जाऊ शकतात. प्राधिकरणाने सांगितले की १५ डिसेंबर २०२३ पासून पुढील ३ महिन्यांसाठी म्हणजे १४ मार्च २०२४ पर्यंत मुदत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**ऑफलाईन अपडेटसाठी इतके शुल्क आकारले जाते**

माय आधार पोर्टलवर आधार तपशील अपडेट करण्याची मोफत सुविधा उपलब्ध होती. जर एखाद्या वापरकर्त्याने ऑनलीन ऐवजी आधार केंद्रावर जाऊन आधार ऑफलाईन अपडेट केला तर त्याला २५ रुपये शुल्क भरावे लागेल. आता मुदत वाढवून दिल्यावरही तीच व्यवस्था कायम राहणार आहे. म्हणजेच मोफत आधार अपडेटची सुविधा फक्त ऑनलाइन बाबतीतच उपलब्ध होईल.या प्रकरणांमध्ये आधार अपडेट करणे आवश्यक आहे

यासाठी वापरकर्त्याला my-adhaar पोर्टल म्हणजेच https:// myaadhaar.uidai.gov.in/ ला भेट द्यावी लागेल. अनेक प्रकरणांमध्ये आधार तपशील अपडेट करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, जर तुमचा पत्ता बदलला असेल तर तो अपडेट केला पाहिजे. आधार प्राधिकरण त्या वापरकर्त्यांना त्यांचे आधार अपडेट करण्यास सांगत आहे, ज्यांच्यासाठी युनिक आयडेंटिटी तयार होऊन १० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे.

### आधार ऑनलाइन अपडेट करण्याची प्रक्रिया

आधार पोर्टलला भेट द्या.

लॉग इन केल्यानंतर, नाव/लिंग/जन्म तारीख आणि पत्ता अपडेट वर क्लिक करा.

Update -adhaar Online वर क्लिक करा.

कोणताही पत्ता/नाव/लिंग अद्यतनित करणे आवश्यक आहे, ते निवडा आणि पुढे जा.

अद्ययावत पुराव्याची प्रत अपलोड करा.

अद्याप कोणतेही पैसे भरावे लागणार नाहीत. १४ मार्चनंतर २५ रुपये भरावे लागतील.

पेमेंट पर्याय पूर्ण होताच, एक नवीन पृष्ठ उघडेल, जिथे तुम्हाला संदर्भ क्रमांक मिळेल.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा –prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विठुरायाच्या प्रसादाचा लाडू निकृष्ट दर्जाचा

## हिवाळी अधिवेशनातील लेखापरीक्षण अहवाल सादर

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक पंढरपूर–** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूरच्या विठुरायाचा लाडू प्रसाद हा निकृष्ट असल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. साल २०२१–२०२२ या वर्षामध्ये एका महिला बचत गटाला लाडू प्रसाद तयार करण्याचे काम देण्यात आले होते. या बचत गटाकडून निकृष्ट पद्धतीने लाडू प्रसाद तयार करण्यात आला होता. असा लेखापरीक्षण अहवाल नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये सादर करण्यात आला आहे. स्वच्छता न राखणे, लाडूची पॅकिंग व्यवस्थित न करणे असा ठपका अहवालामध्ये ठेवण्यात आला आहे. सध्या मंदिर समिती स्वतः लाडू प्रसाद तयार करून त्याची विक्री करते. निकृष्ट दर्जाचा लाडू बनवणाऱ्या व्यक्तींवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.ज्या ठिकणी लाडू बनवला जातोय ती जागा फार अस्वच्छ आहे. लाडूची बुंदी सुकवण्यासाठी कळकटलेली ताडपत्री वापरली जातेय. लाडूच्या पाकिटावर जे घटक असल्याचं लिहिलं जातं ते प्रत्यक्षात त्यात वापरले जात नाहीत. शिवाय प्रसाद म्हणून एका पाकीटात तीन लाडू भरले जातात आणि २० रुपयांना विकले जातात. या लेखापरीक्षण अहवालामध्ये लाडू



प्रसाद पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांकडून पुरेसा व चांगल्या गुणवत्तेचा लाडू प्रसाद न देणे, शेंगदाणा तेला ऐवजी सरकी तेलाचा वापर करणे, पुरेशा प्रमाणात ड्रयफूटस न वापरणे, स्वच्छता न ठेवणे अशा गंभीर त्रुटी आढळून आल्याचे लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.लाडू खाल्यावर भाविकांच्या आरोग्यावर याचा काही परिणाम झाल्यास त्याला लाडू बनवणाऱ्या बचत गट जबाबदार राहिल. तसेच मंदिर समितीचीसुद्धा यात तेवढीच जबाबदारी असेल, असा इशारा लेखापरीक्षण करणाऱ्या पुण्याच्या 'बीएसजी अँड असोसिएट्स'ने नोंदवला आहे. सध्या मंदिर समितीमार्फत आवश्यक कच्चा माल खरेदी करून बुंदीचा लाडूप्रसाद तयार करून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियमांचे पालन करण्यात येत आहे. त्यांच्याकडून तपासणी करून घेऊन व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून लाडू प्रसादाची निर्मिती करण्यात येत असल्याची माहिती राजेंद्र शेळके यांनी दिली.

# आदिवासी विद्यार्थ्यांचा उपायुक्तांच्या दालनाच ठिय्या

## वसतिगृहात सुविधा नसल्याचा आरोप

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** : शहरातील सोनल कॉलनी परिसरात भाड्याच्या इमारतीमध्ये असलेल्या आदिवासी वसतिगृहात मागील चार दिवसांपासून पाणी नसल्याने विद्यार्थ्यांची चांगलीच गैरसोय होत आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार, आवश्यक सोयी–सुविधाही वसतिगृहात मिळत नाहीत. त्यामुळे संतप्त आदिवासी विद्यार्थ्यांनी मंगळवारी अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग येथे धडक देत उपायुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांना शहरी भागात उच्च शिक्षण घेता यावे, याकरिता एक हजार विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वसतिगृह चालविण्यात येत आहे; परंतु शहरातील आदिवासी वसतिगृहाची स्वत:ची इमारत नसून भाड्याच्या इमारतीमध्ये ही वसतिगृहे आहेत. या वसतिगृहामध्ये आवश्यक सोयीसुविधा नसल्याने



विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मागील चार दिवसांपासून सोनल कॉलनी येथील वसतिगृहात पिण्याच्या पाण्याबरोबरच दैनंदिन वापरासाठी लागणारे पाणी नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. अशी परिस्थिती असताना देखील वसतिगृहातील वॉर्डन १५ दिवसांपासून वसतिगृहात आलेले नाहीत. तसेच वसतिगृहामध्ये शासनाच्या २०११ च्या शासन निर्णयानुसार, प्रत्येक वसतिगृहात स्वतंत्र ग्रंथालय, दहा विद्यार्थ्यांमागे एक कॉम्प्युटर व इंटरनेट सुविधा, प्रत्येक वसतिगृहात स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी आरओ फिल्टर बसविणे, दर महिन्यातून एक वेळा विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करणे, व्यायामासाठी जीमची व्यवस्था करणे, दररोज वसतिगृहाची स्वच्छता, स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तकांची सुविधा त्याचबरोबर चार ते पाच वृत्तपत्रे अशा सुविधा देणे अपेक्षित आहे; परंतु वसतिगृहात यापैकी कोणत्याच सुविधा नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.

या मागणीला घेऊन विद्यार्थ्यांनी मंगळवारी आदिवासी विकास विभाग उपायुक्त कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. यावेळी उपायुक्त जागृती कुमरे यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# मनपा कर्मचारी उद्यापासून बेमुदत संपावर

**दि१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** : अमरावती महानगरपालिकेतील सर्व कार्यरत अधिकारी, कर्मचारी व सफाई कामगार तसेच सर्व सेवानिवृत्त कर्मचारी उद्या१४ डिसेंबरपासून संपावर जात आहेत. यामुळे पुन्हा एकदा मनपातील कामकाज प्रभावित होणार असून नागिर सुविधा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मनपा कर्मचारी कामगार संघाने संपाच्या दिलेल्या इशाऱ्यावर प्रशासनाने त्यांना चर्चेसाठी आमंत्रित केले होते. या चर्वेत समाधानकारक तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे गुरुवार (ता. १४) पासून सुरू होणारे बेमुदत काम बंद आंदोलन अटळ आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या रास्त मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी तयार राहावे,



असे संघटनेचे महासचिव प्रल्हाद कोतवाल यांनी म्हटले आहे. गुरुवारपासून सुरू होणाऱ्या बेमुदत काम बंद आंदोलनाच्या पुढील रूपरेषेबद्दल माहिती देण्यासाठी बुधवारी (ता. १३ ) सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी बुधवारी सायंकाळी ५.४५ वाजता मनपा मुख्यालयातील प्रांगणात उपस्थित राहावे असे आवाहन सरचिटणीस प्रल्हाद

**कोतवाल यांनी केले आहे.**

दिवाळीपूर्वीही संघटनेने संपाचे हत्यार उपसले होते. त्यावेळी आयुक्त देविदास पवार यांनी मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देत संप मिटवण्यात यश मिळवले. मात्र त्यांनी शब्द पाळला नाही, असा आरोप करत संघटनेने आता पुन्हा म्यान केलेले संपाचे हत्यार पुन्हा उपसले आहे.

# राज्यात कारागृहांमध्ये दोन हजार पदांना मंजुरी, पण भरती केव्हा?

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** राज्याच्या कारागृह प्रशासनात सुमारे दोन हजार नवीन पदांना मंजुरी मिळाली आहे. त्याअनुषंगाने ऑक्टोबर २०२३ मध्ये शासनादेश देखील जारी करण्यात आला. मात्र, या पदभरती प्रक्रियेबाबत गृह विभागातून कोणत्याही हालचाली होत नसल्याने बेरोजगार युवकांनी पदमंजुरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



राज्याच्या कारागृहांचे महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे गत पावसाळी अधिवेशनात राज्य शासनाने २ हजार २३८ पदांना नव्याने मंजुरी प्रदान केली आहे. आता नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होत असताना या पदभरतीबाबत गृह विभागातून हालचाली नाही. त्यामुळे या पदभरतीकडे अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या बेरोजगार युवकांची हिरमोड झाल्याचे चित्र आहे. कारागृहांत क्षमतेपेक्षा जास्त कैदी बंदिस्त असून, एकूण ६ हजार १३७ पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. केवळ २ हजार २३८ पदांना मान्यता मिळाली आहे. कारागृहांत बहुतांश पदे रिक्त असल्यामुळे कारागृहांच्या अंतर्गत आणि बाह्यसुरक्षेविषयी मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे मंजूर पदांची त्वरेने भरतीप्रक्रिया राबवावी, अशी मागणी बेरोजगार युवकांनी केली आहे.

**पदांना मिळाली आहे मंजुरी**

विशेष कारागृह महानिरीक्षक १, मध्यवर्ती कारागृह अधीक्षक २, मानसशास्त्रज्ञ ७, मनोविकृती शास्त्रज्ञ ६, उपअधीक्षक ७, वैद्यकीय अधिकारी (वर्ग २ व ३) ३५, स्वीय सहायक/ प्रशासन अधिकारी २, कार्यालय अधीक्षक ५, तुरुंगाधिकारी (श्रेणी १) ४५, तुरुंगाधिकारी (श्रेणी २) ११६, मिश्रक २१, वरिष्ठ लिपिक १२, लिपिक २१, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ७, सुभेदार ५६, हवालदार २७७, कारागृह शिपाई १३७०, परिचारक १०.

# विकसित भारत संकल्प यात्रा' मोहिमेच्या माध्यमातून शासकीय योजनाचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा

## – जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, –** विविध योजनांमध्ये पात्र असलेल्या परंतु आतापर्यंत लाभ न मिळालेल्या व्यक्तींपर्यंत केंद्र शासनाच्या योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली 'विकसित भारत संकल्प यात्रा' मोहिम राबविण्यात येत आहे. ही यात्रा शहर व ग्रामीण भागात पोहोचत असून या यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजनाचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी संबंधिताना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे विकसित भारत संकल्प यात्रेच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, मनपा आयुक्त देविदास पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. विवेक घोडके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश सोले, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक पंकज कुमार,जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे तसेच विविध विभागप्रमुख, ऑनलाईनव्दारे उपविभागीय अधिकारी, मुख्यधिकारी, गटविकास अधिकारी, तहसिलदार यावेळी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले की, विकसित भारत संकल्प यात्रेचा दि. २३ नोव्हेंबरपासून शुभारंभ करण्यात आला आला असून शहरी व ग्रामीण भागात आतापर्यंत २०० हून अधिक गावांत यात्रा पोहोचली आहे. यात्रेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना योजनाचा लाभ दिला जात आहे. नागरिकांचा यात्रेला उत्स्फूत प्रतिसाद मिळत आहे. लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात जनजागृती करावी. दुर्गम व लाभ न मिळालेल्या ठिकाणी सर्व विभागाच्या समन्वयाने विशेष शिबिरांचे आयोजन करावे. शासनाच्या योजनापासून पात्र लाभार्थी वंचित राहता कामा नये. शासकीय योजना नागरिकापर्यंत पोहोचविण्याची उत्तम संधी असून शासकीय यंत्रणानी मिशन मोडवर काम करावे, असे निर्देश श्री. कटियार यांनी यावेळी दिले.

'विकसित भारत संकल्प यात्रा' ही देशव्यापी मोहीम ग्राम व शहरी स्तरावर राबविली जात आहे. भारत सरकारच्या एकूण १७ फ्लॅगशिप योजनांचा लाभ लक्ष्यित लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी संकल्प यात्रेतून साध्य केले जात आहे. ही यात्रा दि. २६ जानेवारीपर्यंत जिल्ह्यातील सर्व तालुक्याच्या निश्चित केलेल्या ठिकाणी भेटी देणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. विवेक घोडके यांनी दिली.

# गृह अप्पर मुख्य सचिव अमरावतीत

## पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा


**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –**गृह विभागाच्या अप्पर मुख्य सचिव अमरावतीत सुजाता सौनिक यांनी ११ डिसेंबरला पोलिस आयुक्तालयाला भेट दिली. यावेळी त्यांना अमरावती शहर पोलिस दलातर्फे मानवंदना देण्यात आली. पोलिस आयुक्तालयाच्या वतीने त्यांचे आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी स्वागत केले. यावेळी विशेष



पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, समादेशक राकेश कलासागर, कारागृह अधीक्षक किर्ती चिंतामणी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त पुनम पाटील व अन्य उपस्थित होते.सुजाता सौनिक यांनी भेटी दरम्यान पोलिस आयुक्तालयाच्या प्रशासकिय इमारतीमधील पोलिस नियंत्रण कक्ष, डायल ११२ प्रणाली व ई ऑफीस प्रणालीच्या कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देवुन कामकाजाबाबत आढावा घेतला.पोलिस आयुक्तालयाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत माहिती देवून शासनाकडे प्रलंबित असलेले सीसीटीव्ही प्रणाली प्रकल्प, नवीन पोलिस ठाणेच्या निर्मीतीबाबत प्रस्ताव, पोलिस अधिकारी व अंमलदार यांचे शासकिय निवासस्थान, वरिष्ठ पोलिस अधिकारी यांचे प्रशासकिय कार्यालय व निवास्थानाच्या इमारती बाबत माहिती दिली व मंजूर करण्याची विनंती केली.

# लक्ष्मीकांत बेर्डे यांचे सख्खे बंधू रवींद्र बेर्डे काळाच्या पडद्याआड

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताकमुंबई –** दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांचे सख्खे बंधू रवींद्र बेर्डे यांचं निधन झालं आहे. वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. गेल्या काही वर्षांपासून ते घशाच्या कर्करोगाने त्रस्त होते. मुंबईतील टाटा रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. दोन दिवसांपूर्वी त्यांना रुग्णालयातून घरी आणण्यात आलं होतं. मात्र हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचं निधन झालं. रवींद्र बेर्डे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रवींद्र यांनी बंधू लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत बऱ्याच चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं होतं. त्यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. १९९५ मध्ये 'व्यक्ती आणि वल्ली' या नाटकादरम्यान रवींद्र



बेर्डे यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यावर मात केल्यानंतर २०११ मध्ये त्यांना कर्करोगाचं निदान झालं. आजारपणातही त्यांनी नाटकाची आवड कायम जपली. रवींद्र बेर्डे यांनी मराठीसह हिंदी चित्रपटांमध्येही काम केलं होतं. सिंघम, चिंगी यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी भूमिका साकारल्या होत्या. १९६५ पासून त्यांची नाट्यसृष्टीशी नाळ जोडली गेली. हमाल दे धमाल, चंगू मंगू, थरथराट, झपाटलेला, भुताची शाळा, गंमत जंमत, एक गाडी बाकी अनाडी, खतरनाक यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी आपल्या दमदार अभिनयाची छाप सोडली.

# आज आणि उद्याला जेमिनीड्चा उल्कावर्षाव

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** आज १३ व १४ डिसेंबरच्या रात्री ११ वाजतापासून पहाटे ५ वाजेपर्यंत पूर्व दिशेला उल्का वर्षाव होतांना दिसेल. या उल्का वर्षावाला जेमिनीड्चा उल्का वर्षाव असे म्हणतात. हा उल्का वर्षाव लघू ग्रह ३२०० फेथनच्या कचर्यापासून तयार होतो. हा उल्का वर्षाव खगोलप्रेमिंना अगदी साध्या डोळ्यांनी रात्रभर पाहता येईल. यात १२० उल्का त्याही रंगीबेरंगी दर तासाला निर्माण होतात. अंधार्या रात्री आकाशाचे निरीक्षण करत असताना क्षणार्धात एखादी प्रकाश रेषा चमकून जाताना आपण पाहतो.



या घटनेस तारा तुटला असे म्हटले जाते. परंतु, तारा कधीही तुटत नाही. ही एक खगोलिय घटना असते. याला उल्का वर्षाव असे म्हटले जाते. उल्काचे निरीक्षण आणि त्या निरीक्षणाच्या शास्त्रीय नोंदी याची खगोल जगतात खूप गरज आहे. त्यामुळे बाह्य अवकाशातील वस्तूचे नमुने या उल्केमुळे आपणास मिळतात. यामुळे वस्तूच्या जडण–घडणेचा अर्थ आपणास लावता येतो. धुमकेतू किंवा लघुग्रह सूर्याला प्रदक्षिणा घालून जात असताना त्यातील काही भाग मोकळा होतो.

हे धुमकेतूने किंवा लघुग्रहाने मागे टाकलेले अवशेष होय. या संदर्भात लोकांच्या अंधश्रद्धा खुप आहे. परंतु, अश्या अंधश्रद्धेला खगोलशास्त्रात कुठेही आधार नाही. उल्का वर्षाव रात्री गच्चीवरुन किंवा शहराबाहेर जावून अंधारातून पाहता येईल. सर्व खगोलप्रेमींनी व जिज्ञासूंनी उल्का वर्षावाचे विलोभनीय दृष्य अवश्य बघावे असे आवाहन मराठी विज्ञान परिषद अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

# नगरपंचायतींच्या स्वच्छतेसाठी धोरण ठरविणार

## अॅड. ठाकूर यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांची घोषणा

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर–**राज्यातील नगरपंचायती आणि नगरपालिका यांच्या घनकचरा व्यवस्थापनाबाबत आणि स्वच्छतेबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. याबाबतचे कामे व्यवस्थित रित्या होत नसल्याने त्याबाबतीत सरकारने सर्वकष धोरण ठरवण्याची गरज असल्याची मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी विधानसभेत केली. ठाकूर यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत सर्वकष धोरण ठरविले जाईल अशी ग्वाही सभागृहात दिली .नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ शिवाजी अधिवेशनात चौथ्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान चर्चा करताना अमरावतीच्या काँग्रेस आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी तिवसा नगरपंचायतीच्या व्यवस्थापन आणि स्वच्छतेच्या निमित्ताने सभागृहात प्रश्न उपस्थित केला. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींची नगरपंचायत अथवा नगरपंचायतींचे रूपांतर नगरपालिकांमध्ये झाल्यानंतर त्यांच्या घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. घनकचरा



व्यवस्थापन आणि स्वच्छतेची कामे काही उप कंत्राटदारांना दिली जातात. त्यामुळे या कामांवर नियंत्रण आणि नेमका अंकुश ठेवला जात नाही परिणामी अशा नगरपंचायतींच्या स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. तिवसा नगरपंचायतीमध्ये सुद्धा अशा पद्धतीचा प्रश्न निर्माण झाला असून यासंदर्भात राज्य सरकारने तिवसा नगरपंचायतीसह राज्यातील सर्वच नगरपंचायतींमध्ये घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेबाबत एक निश्चित धोरण ठरवायला हवे, अशी मागणी सरकारकडे केली.ड .ठाकूर यांच्या या मागणीला उत्तर देताना नगर विकास मंत्री आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, यासंदर्भात निश्चितच राज्य सरकारकडून सर्वकष धोरण लवकरच ठरवण्यात येईल. नगरपंचायतींच्या घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेबाबत नेमके काय धोरण ठरवायचे याबाबत नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांना निर्देश दिले जातील अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिली.

# शिंदे गटाच्या आमदारांनी ज्या प्रश्नाला बगल दिली, त्याला भरतशेठ भिडले

## उलट तपासणीत तुफान फटकेबाजी

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर –** शिवसेना आमदार अपात्रताबाबत विधिमंडळात विधानसभा अध्यक्षांसमोर सुनावणी सुरू आहे. शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांची उलट तपासणी झाली. ठाकरे गटाचे वकील ॲड. देवदत्त कामत यांच्याकडून त्यांना प्रश्न विचारले गेले. भरत गोगावले यांनी ॲड. कामत यांच्या प्रश्नावर आपल्या स्टाईलने उत्तर दिले. गुवाहाटी बाबतच्या प्रश्नाला याआधी शिंदे गटाच्या आमदारांनी उलट तपासणीत थेट उत्तर दिले नाही. तिथे मात्र, भरत गोगावले यांनी स्पष्टपणे उत्तरे दिली.

मंगळवारच्या कामकाजात शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांची उलट तपासणी झाली. ठाकरे गटाचे वकील ॲड. कामत यांनी विचारलेल्या काही प्रश्नांना थेट उत्तरे दिली तर काही प्रश्नानांना तिरकस उत्तरे दिली. त्यांच्या या उत्तराने सभागृहात हसू उमटले. त्यामुळे गंभीर असणारे वातावरण हलकं फुलकं झाले.



### 'या' कारणांसाठी सूरतला गेलो

आमदार भरत गोगावले यांना सूरतबाबतही प्रश्न विचारण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रातून जाण्यासाठी सूरत का निवडले असा प्रश्न गोगावले यांना विचारण्यात आला. त्यावर गोगावले यांनी सूरत चांगले ठिकाण आहे, असे मी ऐकले होते. त्यामुळे तिकडे जाऊन आपण व्यक्तिश: बघावे, म्हणून मी सुरत हे ठिकाण निवडले असे उत्तर दिले. त्यांच्या या उत्तराने सभागृहात हास्य उमटले. काही प्रश्नानंतर गोगावले यांना सुरतमधील एकाच हॉटेलमध्ये सर्व आमदारांनी जमणे, हा योगायोग नव्हता; तर हा पूर्वनियोजित कार्यक्रम होता. हे बरोबर आहे का? असा प्रश्न केला. त्यावर गोगावले यांनी – ते मला माहित नाही. ते तिकडे कसे आले हे त्यांनाच माहीत असेल. शिवाजी महाराज तिकडे गेले होते, म्हणून मला वाटलं ते चांगलं ठिकाण असणार म्हणून मी तिकडे गेलो,असे उत्तर दिले.

### 'त्या' प्रश्नांना भरत गोगावले थेट भिडले

उलट तपासणीत शिंदे गटाच्या आमदारांना गुवाहाटीला जाण्यासाठी प्रवास खर्च कोणी केला, हॉटेलचा खर्च कोणी केला, असे प्रश्न विचारण्यात आले. मात्र, यावर थेट उत्तर देणे आमदारांनी टाळले. मात्र, भरत गोगावले यांनी गुवाहाटीच्या खर्चाबाबत थेट उत्तर दिले. ॲड. कामत यांनी गुवाहाटीला जाण्यासाठी तुम्ही स्वतःची व्यक्तिगत तिकीट काढले होते का? की कुणी काढली होती असा प्रश्न विचारला. त्यावर भरत गोगावले यांनी आम्ही स्वतःच्या खर्चाने गेलो..कामाख्या देवीचे दर्शन स्वतःच्या पैशाने घेणे उचित आहे असे उत्तर दिले.

# तर मंत्रिपदाच्या शपथेचा कागद फाडून टाकेन

## बच्चू कडूंचं थेट वक्तव्य



**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर –** 'महाराष्ट्र विधिमंडळाच्या मागील अधिवेशनानंतर राज्य सरकारचा मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं बोललं जात होतं. मात्र मंत्रीमंडळ विस्तार झाला नाही. त्यामुळे सध्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनानंतर मंत्रीमंडळ विस्तार होईल, असा दावा राजकीय वर्तुळातून केला जात आहे. याबाबत विचारलं असता प्रहार जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही. मंत्रीपदाच्या शपथीचा कागद फाडून टाकेन, असं मोठं विधान बच्चू कडू यांनी केलं आहे.

हिवाळी अधिवेशनानंतर मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं तुम्हाला वाटतं का? असं विचारलं असता बच्चू कडू म्हणाले, मी मंत्रिपदाचा दावाच नाकारला आहे. त्यामुळे हा प्रश्न तुम्ही भरत गोगावलेंना किंवा संजय शिरसाटांना विचारला पाहिजे. मी आता दावाच सोडला आहे तर मंत्रीमंडळ विस्ताराबाबत मला कशाला विचारता? मंत्रीपद हा विषय मी माझ्या डोक्यातून कधीच काढून टाकला आहे.

बच्चू कडूंना कसल्याही मंत्रिपदाची गरजही नाही. 'हम अकेलेही काफी है, सब संभालने के लिए.'आता मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही. मंत्रिपदाच्या शपथपत्राचा कागद फाडून टाकेन आणि चार तुकडे करेन, असं थेट वक्तव्य बच्चू कडू यांनी केलं आहे. दरम्यान, बच्चू कडूंनी विधानसभेत वंचित घटकांच्या बाजूने भूमिका मांडताना सत्ताधाऱ्यांकडून नागरिकांमध्ये भेदभाव केला जात असल्याचा आरोप केला. यावेळी चालकांना कामगार दर्जा देण्याची मागणी त्यांनी केली. सगळ्या वाहनांच्या चालकांना कामगार दर्जा देणं गरजेचं आहे. गावागावांमधल्या भूमीहीन मजुरांसाठी योजना आखायला हव्यात. शेतकऱ्यांप्रमाणेच या भूमीहीन मजुरांसाठीही योजना करायला हव्यात. देशभरात ११ हजार शेतमजुरांच्या आत्महत्या झाल्या आहेत. तो मजूर आहे म्हणजे कामगार नाहीये का? तुम्ही यावर कधी विचार केला आहे का? आपण यावर विचार करणं फार गरजेचं आहे, असं बच्चू कडू म्हणाले.

# वैभव वानखडे राजीव गांधी पंचायतराज संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी

**दि१३विदर्भ प्रजासत्ताक तिवसा : –** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेशी निगडीत व महत्वपुर्ण असलेल्या राजीव गांधी पंचायतराज संघटनेच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी वैभव वानखडे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी पंचायतराज संघटनेची स्थापना केली होती. वैभव वानखडे हे तिवसा नगरपंचायतचे माजी अध्यक्ष असून जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, अमरावती शहर युवक काँग्रेसचे सचिव, प्रसिद्धीप्रमुख व तिवसा विधानसभा सोशल मिडीयाचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेवून त्याच्याकडे राजीव गांधी



पंचायतराज संघटन अमरावती जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे, वैभव वानखडे यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय आ. यशोमती ठाकूर, आ. बळवंत वानखडे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी आ. प्रा. विरेंद्र जगताप, प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव हरिभाऊ माहोड, माजी महापौर विलास इंगोले, मिलींद चिमोटे, शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलू शेखावत याना दिले आहे.

# महाराष्ट्रासह उत्तर भारतात गारठा वाढला



**दि. १३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली –** देशात बहुतेक राज्यांमध्ये तापमानात घट झाल्याचं दिसून येत आहे. मिचॉन्ग चक्रीवादळाचा प्रभाव कमी झाला असला तरी, वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे आजही पावसाची शक्यता आहे. देशात १३ ते १६ डिसेंबर दरम्यान पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ईशान्य भारत आणि दक्षिण भारतात पावसाची शक्यता (ठळप झीशवळलींळेप) आहे. पर्वतीय भागात जोरदार बर्फवृष्टी सुरु आहे. तामिळनाडू आसामसह काही भागात आज पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

पुढील दोन दिवस पावसाची शक्यता

भारतीय हवामान विभागाच्या (खचऊ) अंदाजानुसार, येत्या दोन दिवसांत केरळ आणि माहेमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, दिल्लीच्या तापमानात आणखी घट होईल आणि सकाळी धुके पडण्याची शक्यता आहे. उत्तर भारतात थंडीची लाट आली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे तापमानात आणखी घट होणार आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळणार आहे.

### देशाच्या तापमानात मोठ्या प्रमाणात घट

गेल्या चार दिवसांपासून देशाच्या तापमानात मोठी घट झाली आहे. काश्मीर आणि हिमालच प्रदेशासह हिमालयीन भागात बर्फवृष्टी होण्याचा अंदाज आहे. दक्षिण भारतात आज पावसाची शक्यता असली तरी, महाराष्ट्रात आज हवामान कोरडं राहणार आहे, तर काही भागात ढगाळ वातावरण पाहायला मिळणार आहे. तामिळनाडू, कराईकल, केरळ, पुद्दुचेरी लक्षद्वीप भागात आज मुसळधार पावसाची शक्यता आहे. चेन्नईमध्ये आज मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

### कुठे धुके तर, कुठे पाऊस

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज, १३ डिसेंबर २०२३ ला अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये पावसाची शक्यता आहे. यासोबतच आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये १३ आणि १४ डिसेंबरला दाट धुके पडण्याची शक्यता आहे. या राज्यांव्यतिरिक्त पंजाब, उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्येही धुके पडण्याची शक्यता आहे. आयएमडी (खचऊ) च्या अंदाजानुसार १६ डिसेंबरला दक्षिणेकडील तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष शेखर भोयर यांचा जुनी पेन्शन जनक्रांती मोर्चाला शिक्षक महासंघाचा पाठिंबा




*मंगळवारी नागपूर विधान भवनावर जुनी पेन्शन जनक्रांती मोर्चा काढण्यात आला होता या मोर्चाला पाठिंबा शेखर भोयर यांनी पाठिंबा देत या मोर्चामध्ये सामील झाले या प्रसंगी भोयर यांनी उपस्थित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच सरकारी कर्मचारी बांधवांना संबोधित करताना भोयर म्हणाले की शिक्षक महासंघ जुनी पेन्शन च्या प्रत्येक लढ्यात सहभागी झाला आहे आणि जोपर्यंत जुनी पेन्शन मिळत नाही तोपर्यंत शिक्षक महासंघ आणि मी आपल्या प्रत्येक लढ्यात सोबत राहील असा शब्द देखील उपस्थितांना दिला...*

# राजेंद्र जाधव यांच्या अपिलावर सुनावणी आटोपली

## काय निर्णय येणार ? या कडे सहकार क्षेत्राचे लक्ष

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक निवडणुकीत बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष राजेंद्र जाधव यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी शंकर कुंभार यांनी अवैध ठरविल्याने त्यांनी पुणे येथे सहकार आयुक्तांकडे अपील दाखल केली होती. या अपिलावर मंगळवारी सुनावणी दोन्ही पक्षांची सुनावणी घेण्यात आली. निर्णय मात्र राखून ठेवण्यात आला आहे. त्यामुळे या निर्णयाकडे सहकारक्षेत्राचे लक्ष लागले आहे.

जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीसाठी ४ डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. या प्रक्रियेत ८६ नामांकन दाखल झाले होते. छाननीदरम्यान १३ नामांकन अवैध ठरवित ७३ पात्र उमेदवारांची वादी ६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या यादीत बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष राजेंद्र जाधव यांचा अर्ज अवैध ठरविण्यात आला होता. प्रफुल्ल गुडघे, हरिभाऊ लुंगे आणि गजानन टाले यांनी राजेंद्र जाधव यांच्या अर्जावर आक्षेप घेतला होता. त्यामुळे या निर्णयाविरोधात राजेंद्र जाधव यांनी पुणे येथे सहकार आयुक्तांकडे अपिल दाखल केली होती. या अपीलावर मंगळवारी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीदरम्यान सहकार आयुक्तांनी दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेतली. मात्र, निर्णय राखून ठेवण्यात आला आहे. नामांकन मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजेच २० डिसेंबरपर्यंत हा निर्णय देता येतो. त्यामुळे सहकार आयुक्त यावर केव्हा निर्णय देतात, याकडे जिल्ह्यातील सहकारक्षेत्राचे लक्ष लागले आहे.


# महादेव ॲपचा मालक उप्पलला दुबईत पोलिसांनी घेतलं ताब्यात

## मुंबई गुन्हे शाखेच्या तपासाला वेग येणार?

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** महादेव ऑनलाइन बेटिंग ॲपच्या दोन मुख्य मालकांपैकी एक असलेल्या रवी उप्पलला स्थानिक पोलिसांनी दुबईत ताब्यात घेतलं आहे. ईडीच्या आदेशानुसार इंटरपोलने रेड नोटीस जारी केली होती. या नोटीसनुसार स्थानिक पोलिसांनी कारवाई करत रवी उप्पलला ताब्यात घेतलं आहे.

रवी उप्पला ताबा घेण्याकरिता ईडीचे अधिकारी दुबईच्या अधिकाऱ्यांशी संपर्कात आहेत. महादेव ॲपच्या माध्यमातून सट्टेबाजी आणि मनी लाँड्रिंग झाल्याचा रवी उप्पलवर आरोप आहे. या प्रकरणी छत्तीसगड पोलीस, मुंबई पोलिसांसह ईडीकडून तपास करण्यात येत आहे. महादेव बेटिंग ॲप प्रकरणात अभिनेता आणि उद्योगपतींची नावं असल्यानं या प्रकरणाकडं संपूर्ण देशाच लक्ष लागलेलं आहे. १५,००० कोटी रुपयांच्या महादेव सट्टेबाजी ॲप घोटाळ्यानं तपास संस्थांच्या अधिकाऱ्यांची झोप उडविली आहे. तपास संस्थांची चौकशी सुरू असताना रवी उप्पल हा विदेशात लपून बसला होता. त्यामुळे तपास संस्थांना चौकशी करण्यात अडथळा येत होता. रवी उप्पलला भारतात आल्यानंतर तपासाला वेग येण्याची शक्यता आहे.

माटुंग्यातील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बनकर यांच्या तक्रारीनंतर मुंबईत रवी उप्पल आणि शुभ सोनी यांच्यावर फसवणूक आणि जुगार अशा विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. या प्रकरणात आरोपींना हवाला व्यवहारातून पैसे मिळाल्याचा संशय असल्यानं आरोपी हे ईडीच्या रडारवर आहेत.




महादेव सट्टेबाजी ॲप प्रकरणी प्रथम माटुंगा पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याची व्याप्ती आणि गुंतागुंत पाहता हे प्रकरण वर्ग करण्यात आल्यानंतर मुंबई गुन्हे शाखेकडून तपास करण्यात येत आहे. मुंबई पोलिसांनी महादेव बेटिंग ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांच्यासह ३० हून अधिक संशयितांवर यापूर्वीच गुन्हा दाखल केला आहे. तर १४ नोव्हेंबर रोजी डाबरचे संचालक गौरव बर्मन आणि कंपनीचे अध्यक्ष मोहित यांच्यासह ३२ जणांवर गुन्हा दाखल केला.

छत्तीसगड पोलिसांनी सौरभ चंद्राकर आणि त्याचा सहकारी रवी उप्पल लुक आऊट सर्क्युलर नोटीस काढलेले आहे. रवी उप्पलला भारतात येताच अटक करण्याचे आदेश देण्यात आले होते. सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पलनं मध्य प्रदेशातील दुर्ग भिलाईसह देशभरात विविध ठिकाणी ऑनलाईन सट्टेबाजीचा धंदा सुरू केला होता. बेरोजगार तरुणांना नोकरी देण्याच्या नावाखाली अवैध मार्गानं कमाई करून रवी उप्पल हा दुबईला स्थायिक झाला. तेथून त्यानं अनेक सेलिब्रिटींनांही आपल्या अवैध व्यवसायात धंद्यात सामील करून घेतलं.

# .. तर लाठीचार्ज नक्कीच विसरुन जाऊ; अखेर रोहित पवारांचे मुख्यमंत्र्यांकडे निवदेन

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

बेरोजगार, युवा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या युवा संघर्ष यात्रेच्या समारोपीय सभेनंतर मंगळवारी नागपुरात राडा झाला. राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि पोलिसात अर्धा तास झालेल्या झटापटीमुळे टेकडीरोडवर तणावाची स्थिती निर्माण झाली होती. बिघडलेल्या परिस्थितीवर नियंत्रण मिळण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. त्यानंतर, अखेर आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले.



सरकारच्या वतीने निवेदन स्वीकारण्यासाठी कुणीतरी सभास्थळी यावे, असे आवाहन रोहित पवार यांनी केले होते. मात्र, सभा संपल्यानंतरही कुणी निवेदन स्वीकारण्यासाठी आले नाही. त्यामुळे रोहित पवार यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह निवेदन ठेवलेल्या बैलगाडीसह विधानभवनाकडे कूच केले. पोलिसांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. यात झटापट झाली. लाठीचार्जनंतर कार्यकर्तेही आक्रमक झाले. त्यांनीही बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. या सगळ्या संघर्षात आमदार रोहित पवार, आमदार संदीप क्षीरसागर, रोहित पाटील, सलील देशमुख, राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या पूजा पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

अखेर परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना युवा संघर्ष यात्रेतील मागण्यांचे निवेदन दिले. नागपूर विधिमंडळात रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी, ८०० किमी चालत काढलेल्या संघर्ष यात्रेत भेटलेल्या युवकांनी, शेतकऱ्यांनी, नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे आणि मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे दिले. तसेच, युवा आणि जनतेच्या या मुद्द्यांवर या अधिवेशनात निर्णय घेतला तर आमच्यावर झालेला लाठीचार्ज आम्ही नक्कीच विसरून जाऊ, असेही आमदार पवार यांनी म्हटले. दरम्यान, युवा संघर्ष यात्रेची सांगता सभा नागपुरात आयोजित करण्यात आली होती. या सांगता सभेला राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांनी उपस्थिती दर्शवत युवकांना मार्गदर्शन केलं.

# एकाबाजूला गावबंदी तर दुसरीकडे संघर्ष यात्रा काढली जाते, ही मॅच फिक्सिंग का?

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मराठा आरक्षणासाठी एकाबाजूला गावबंदी केली जाते तर दुसऱ्या बाजूला संघर्ष यात्रा काढली जाते, ही मॅच फिक्सिंग आहे का? मनोज जरांगे पाटलांच्या सभेची सुरुवात करणारे छत्रपती संभाजीनगरचे प्रदीप साळुंखे जे आहेत. तो तिथे कसा दिसतो? मग त्याचे फोटो एका पक्षाच्या विशिष्ट नेत्यांसोबत कसे दिसतात. अलीकडेच ज्याला अटक केले त्याचे फोटो एका ज्येष्ठ नेत्यासोबत कसे दिसले? याची उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजे. कारण जो माणूस आरक्षणासाठी लढला, त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्याच्या नावाने टीका होत असेल तर आम्हाला स्पष्टीकरण मिळालेच पाहिजे अशा शब्दात भाजपा



आमदार नितेश राणेंनी विधानसभेत मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर शंका उपस्थित केली.

नितेश राणे म्हणाले की, आमच्या मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शिवरायांची शपथ घेत मराठा समाजाला आरक्षणाचे आश्वासन दिलंय, ज्वलंत मराठा छत्रपती शिवाजी महाराजांची खोटी शपथ घेणार नाही. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत मराठ्यांना आरक्षण मिळणारच हे नक्कीच आहे. परंतु आरक्षणानिमित्त जे आंदोलन उभे राहतंय त्यावर संशय यायला लागला आहे. जालनात आमचा जो भाऊ लढतोय त्याच्यावर फार प्रेम येतंय. परंतु ज्यावेळी कोपर्डी घटनेत आरोपींवर हल्ला केला तेव्हा त्याला वाचवायला कुणीही आले नव्हते. आमच्यासारखे लोक त्यांच्या पाठिशी उभे राहिले आणि त्यातून या सगळ्यांना बाहेर काढले. विरोधकांचे हे पाप आहे. मराठ्यांना आरक्षण मिळावे ही त्यांची मानसिकता नाही. मविआ सरकारमध्ये वसुली प्रामाणिकपणे केली जायची म्हणून आज विरोधात बसण्याची वेळ आलीय. मविआ सरकारने प्रामाणिक प्रयत्न झाले असते तर राज्यात हिंसाचार झाला नसता, ज्या तरुणांनी आत्महत्या केली त्यांच्यावर ती वेळ आलीच नसती. या लोकांचे जीव गेले त्याला जबाबदार महाविकास आघाडी आहे. एक व्यक्ती उपोषणाला बसतो, सगळे त्याला समर्थन करतायेत. पण आजूबाजूला जी हिंसा घडतेय त्यावरून फक्त देवेंद्र फडणवीसांना टार्गेट केले जातेय. मग यामागे नेमके कोण याचाही शोध घेतला पाहिजे. तो स्वत:हून बोलतोय का त्याच्या हातात कुणी स्क्रिप्ट दिलेली आहे. दुसऱ्या कुठल्याच नेत्यावर टीका होत नाही. पक्षावर टीका होत नाही. केवळ एका माणसाला टार्गेट केले जातेय. सगळ्यांवरच टीका करायला हवी असं त्यांनी सांगितले.

# मोर्शीची डाकसेवा कोलमडली

## देशव्यापी संपात तालुक्यातील डाक सेवक विविध मागण्यासाठी बेमुदत संपावर

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

ऑल इंडिया ग्रामीण डाक सेवा संघटना व नॅशनल युनियन ऑफ ग्रामीण डाक सेवक यांच्या वतीने देशव्यापी बेमुदत संप दि.१२ डिसेंबर पासून सुरू आहे.

टपाल विभागातील कर्मचाऱ्यांना आठ तास काम व पेन्शन योजना सुरू करा तसेचग्रुप विम्याचा लाभ पाच लाख रुपये करण्यात यावा, डॉ. कमलेश चंद्र कमिटीच्या सर्व सकारात्मक शिफारसी दि. एक डिसेंबर १६ पासून अंमलबजावणी करण्यात यावी इत्यादी मागणीसाठी मोर्शी तालुक्यातील डोंगर यावली ,पाळा, अंबाडा, खेड ,हिवरखेड , निंभी, चिखल सावंगी , लडकी, दापोरी,येरला इत्यादी गावातील सेवक संपावर गेले असल्याने ग्रामीण भागातील टपाल व्यवस्था कोलमंडली आहे.

# उद्याला गोवारी बांधव धडकणार नागपूर विधान भवनावर

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गोंड गोवारी जमातीला १९८५ पूर्वी आदिवासी जमातीचे प्रमाणपत्रानुसार अनुसूचित जमातीचे सर्व लाभ दिले जात होते. परंतु २४ एप्रिल १९८५ च्या मार्गदर्शक सूचनांच्या शासन निर्णयामध्ये गोंड गोवारी जमातीबाबत चुकीची माहिती दिली. ज्यामुळे गोंड गोवारी यांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळणे बंद झाले.. परंतु हा अन्याय दूर करून आदिवासींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्राच्या मागणीसाठी १४ डिसेंबरला आदिवासी गोंड गोवारी जमात संवैधानिक हक्क संघर्ष कृती समितीकडून नागपूर अधिवेशनावर महामोर्चा काढला जाणार आहे. या मोर्चात समाज बांधवानी सहभागी व्हावे असे आवाहन मनोहर सहारे, रामदास नेवारे, मोहन राऊत, कृष्णा चौधरी, जयश्री राऊत, रावसाहेब नेवारे, नंदू निळकंठ सहारे, सोनोने, योगेश इजंळकर, रावसाहेब नेवारे मारुती नेवार, अशोक खंडरे, माधव कोहळे, नामदेव ठाकरे, सुरेश राऊत, गजानन कोहळे यांनी केले आहे.

# आंनदराव अडसूळ लढणार अमरावती लोकसभा

## पदाधिकाऱ्यांना कामाला लागण्याच्या सूचना

**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती लोकसभा मतदारसंघात शिवसेनेतून दोन वेळा प्रतिनिधित्व केलेले माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ पुन्हा अमरावती मतदारसंघातून लोकसभा शिवसेना शिंदे गटाच्या वतीने निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे शिवसेनेच्या विभागीय मेळाव्यात ठरले आहे.

स्थानिक विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत आनंदराव अडसूळ अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढतील. त्यासाठी पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे, असे आदेश वजा सूचना विभागीय संपर्कप्रमुख पारस्कर यांनी दिले




आहे. माजी आनंदराव अडसूळ यांनी बुलडाणानंतर अमरावती लोकसभा मतदारसंघात दोनदा शिवसेनेचे प्रतिनिधित्व केले असून ते खासदार होते. मधल्या काळात ते निवडणूक लढवणार नाहीत, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत केलेला बंड त्यानंतर राज्यात निर्माण झालेली राजकीय परिस्थिती यानंतर अमरावती मतदारसंघातही राजकीय वातावरण बदलली असून आनंदराव अडसूळ शिवसेनेचे उमेदवार झाले, तर विद्यमान खा. नवनीत राणा यांची अडचण होऊ शकते. नवनीत राणा यांनी भाजपाची 'जवळीक साधल्यामुळे २०२४ च्या निवडणुकीत त्या भाजपाचे उमेदवार राहतील किंवा स्वाभिमान पक्षातून निवडून लढवतील, हे अजून निश्चित झालेले नाही. मात्र शिंदे सेना हे भाजपासोबत असल्याने अडसुळांनी आता घरचा अहेर दिल्याने अमरावती येथील राजकीय वातावरण तापले आहे. बैठकीला विभागीय सहसंपर्कप्रमुख विलास पारकर, निरीक्षक मनोज हिरवे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अरुण पडोळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल अरबट यांच्यासह जिल्ह्यातून आलेले तालुकाप्रमुख शहरप्रमुख शाखाप्रमुख यांचीही उपस्थिती होती.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेवरून मतभेद

## आ. सुलभा खोडकेंनी विधिमंडळात उपस्थित केला मुद्दा

**दि.१४विदर्भ प्रजसत्ताक अमरावती**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी बडनेरा मतदारसंघातील कोंडेश्वर नजीकच्या अलियाबाद (वडद) येथील जागा निवडण्यात आली असली, तरी आमदार सुलभा खोडके यांनी या जागेला स्पष्टपणे विरोध दर्शविला आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना सुलभा खोडके यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जमिनीचा मुद्दा उपस्थित करीत प्रस्तावित जागा ही शहरापासून १५ किलोमीटर अंतरावर असल्याने विद्यार्थी आणि रुग्णांसाठीदेखील ती गैरसोयीची असल्याचे म्हटले आहे.



जिल्ह्याच्या आरोग्य सुविधेमध्ये सुधारणा करणे व गरजूंपर्यंत आरोग्याच्या सर्व सुविधा पुरविणे हा अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यामागचा मुख्य उद्देश आहे. मात्र अमरावती शहरापासून दूर जागेचा प्रस्ताव असल्याने त्याचा लाभ सामान्य गरजू रुग्णांना मिळणार नाही. तसेच धारणी, मेळघाटसारख्या दुर्गम भागातील रुग्णांनासुद्धा ते गैरसोयीचे ठरेल. तसेच विद्यार्थ्यांनासुद्धा ते अडचणीचे ठरणार आहे. म्हणून शहराच्या मध्यभागी ज्या ठिकाणी आरोग्याच्या सर्व सुविधा व वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहे. त्याच ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावे, अशी मागणी सुलभा खोडके यांनी केली आहे.

जागेबाबत आपण शासनाकडे प्रस्ताव दिला असून त्याचा विचार करूनच अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे शहरात सर्व आरोग्य सुविधा व वैद्यकीय सेवा उपलब्ध असलेल्या भागात सुरु करण्यात यावे, असे सुलभा खोडके यांचे म्हणणे आहे. अलियाबाद (वड्द) येथील ई-वर्ग जमिनीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत उभारली जाणार असल्याचा दावा आमदार रवी राणा यांनी केला होता. ही जमीन बडनेरा मतदारसंघातील असल्याने या जागेसाठी ते आग्रही असल्याचे सांगण्यात आले होते. महसूल, नगर रचना विभाग, महावितरण कंपनीसह ११ विभागांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले असून अलियाबाद येथील ११ हेक्टर जमिनीवर वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यास सरकारने मंजुरी दिल्याचे रवी राणा यांचे म्हणणे आहे.

# अमरावतीत डेंग्यूचा प्रकोप! ५४४ रुग्ण आढळले, एकाचा मृत्यू

**दि.१४विदर्भ प्रजसत्ताक अमरावती:**

जिल्ह्यात अकरा महिन्यांत ५४४ डेंग्यू रुग्ण आढळले आहेत. सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत रुग्णवाढ अधिक आहे. एका रुग्णाचा डेंग्यूमुळे मृत्यू झाल्याची नोंद ऑक्टोबर महिन्यात झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत डेंग्यूच्या रुग्णसंख्येत यंदा वाढ झाल्याने आरोग्य यंत्रणेची चिंता वाढली आहे.

२०२२ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत १८५ डेंग्यू रुग्णसंख्या होती. यंदा ही आकडेवारी तीनपटीने वाढली आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून डेंग्यू रुग्णांची संख्या वाढण्यास सुरुवात झाली. डेंग्यू हा एडिस इजिप्ती या मादी डासाच्या चाव्यामुळे होतो. यामध्ये रुग्णाला डोकेदुखी, तीव्र तापासोबत स्नायू आणि सांधेदुखीचा त्रास होतो. यासोबतच डेंग्यूच्या तापामुळे शरीरातील प्लेटलेटचे प्रमाण देखील कमी होऊ लागते. जर प्लेटलेटची संख्या जास्तच कमी झाली की, रुग्णाचा मृत्यू देखील होऊ शकतो.कीटकजन्य आजारांचे प्रमाण हे पावसाळ्यात वाढायला सुरूवात होते. ज्यामध्ये डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया हे आजार डोके वर काढतात. जागोजागी साचणाऱ्या पाण्यामध्ये डेंग्यू आजार पसरविणारे डास वाढतात. सध्या वातावरणातील बदलामुळे निर्माण झालेला थंडावा हे कीटकजन्य आजार वाढीसाठी कारणीभूत ठरत असल्याचे आरोग्य प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे नागरिकांनी ताप, डोकेदुखी, सांधेदुखी, अंगावर पुरळ येणे यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने रुग्णालयात जाऊन रक्ताची चाचणी करण्याची गरज आहे. जिल्ह्यात जून २०२३ पासून डेंग्यू रुग्णांची संख्या वाढण्यास सुरूवात




झाली असून, सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या तीन महिन्यांमध्ये सर्वाधिक डेंग्यू रुग्ण आढळले आहेत. तर ऑक्टोबर महिन्यात एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद आरोग्य प्रशासनाने केली आहे.अमरावती महापालिका क्षेत्रात सर्वाधिक डेंग्यू रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रात १०२७ डेंग्यू संशयित रुग्णांचे रक्तजल नमुने आरोग्य विभागाने तपासण्यात आले. यामध्ये ३३३ रुग्ण सकारात्मक आढळले आहेत. यामध्ये एकाचा मृत्यूदेखील डेंग्यूमुळे झाल्याची नोंद आरोग्य प्रशासनाने केली आहे तर ग्रामीण भागातील १२८८ संशयित रुग्णांमध्ये २११ रुग्णांचा अहवाल सकारात्मक आला आहे.

जिल्ह्यात डेंग्यूबरोबरच अकरा महिन्यांमध्ये ११६ चिकुनगुनिया रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये ग्रामीण भागात ७९ तर महापालिका क्षेत्रात ३७ रुग्ण आढळले आहेत. त्याचबरोबर मलेरियाचे एकूण ३३ रुग्ण असून, ग्रामीण क्षेत्रात २८ तर मनपा क्षेत्रात ५ रुग्ण आढळले आहेत.

महाराष्ट्रात २०२२ मध्ये डेंग्यूचे ८ हजार ५७८ रुग्ण आढळून आले होते, तर २७ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली होती. यावर्षी ३० नोव्हेंबर अखेर १७ हजार ५३१ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत, तर १४ जणांचा मृत्यू झाला आहे.

# लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकात भीषण आग

**दि. १३ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकातील आरक्षण केंद्र आणि विश्रामगृहात बुधवारी दुपारी भीषण आग लागली. स्थानकामधील उपहारगृहाचे काम सुरू असताना ही आग लागली. आग लागताच तात्काळ स्थानकातील प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. आग वाढत असल्याचे घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रवाशांनी सांगितले. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये गोंधळ झाला, तर काही प्रवासी घाबरले.

घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले असून अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. तसेच, मध्य रेल्वे प्रशासनाने खबरदारी म्हणून एलटीटी स्थानकातील फलाट क्रमांक १ वरील ओव्हर हेड वायरचा विद्युत पुरवठा खंडीत केला आहे.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या अन्नत्याग आंदोलनाची दखल : पत्रकारांच्या मागण्यांसाठी अभ्यास गटाची स्थापना;राज्य शासनाचा निर्णय

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यभरातील पत्रकारांचे शासन दरबारी नोंदणी करण्यात यावी अन्यथा नागपूर येथील विधान भवन समोर हिवाळी अधिवेशनात संघाचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे व जिल्हाध्यक्ष प्रविण शेगोकार यांनी अन्नत्याग आंदोलनाचा इशारा मुख्यमंत्र्यांना निवेदनातून दिला होता. आंदोलनाची दखल घेत शासनाने पत्रकारांच्या मागण्यांसाठी अभ्यास करण्याकरिता एक अभ्यास गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.शासनाने सकारात्मक पाऊल उचलल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आभार मानले आहेत.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे सरचिटणीस विश्वासराव आरोटे पश्चिम विदर्भाध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात पत्रकारांच्या कल्याणासाठी स्वतंत्र महामंडळ, घरे, जिल्हा व तालुकास्तरावर पत्रकार भवन, पत्रकारांच्या पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था, पत्रकारांचे आरोग्य या विषयावर वेळोवेळी जिल्हाध्यक्ष प्रविण शेगोकार ह्यांनी मागनी रेटून धरली.पत्रकारांवर अन्याय अत्याचार झाल्यास आंदोलने सुद्धा केलेली आहेत. पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत महाराष्ट्रातील पहिला गुन्हा तिवसा पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल करण्यात आला आहे १६ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले होते.यामध्ये पत्रकारांचे निवृत्तीवेतन वाढविणे, पत्रकारांना घरे, पत्रकारांचे आरोग्य, पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ या माध्यमातून कर्जाची उपलब्धता, आधिस्वीकृतीचे नियम शिथिल करणे, पत्रकारांना किमान वेतन मिळाले पाहिजे या याचा अन्य मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते. जिल्हाध्यक्ष प्रविण शेगोकार यांनी सातत्याने मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला. प्रदेशाध्यक्ष ,प्रदेश सरचिटणीस, पश्चिम विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, अमरावती जिल्हाध्यक्ष प्रविण शेगोकार यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पालकमंत्र्यांना भेटून या संदर्भात पत्रकारांच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली होती.

शासनाने एक अध्यादेश काढून पत्रकारांच्या मागण्यांवर पावसाळी अधिवेशनात विचार करण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.या समिती मार्फत अधिस्वीकृति धारक पत्रकारांची व्याप्ती वाढविणे, डिजिटल माध्यमातून केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्य शासनाच्या धोरणांमध्ये सुधारणा करणे, पत्रकारांना शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी धोरण तयार करणे, कॅशलेस वैद्यकीय सुविधा देण्यासंदर्भात नियम व विमा तयार करणे यासह पत्रकारांच्या अन्य मागण्यांबाबत विचार करणे आदी विषयांवर अभ्यास केला जाणार आहे. या निर्णयामुळे अन्नत्याग आंदोलनाची शासनाने शासनाने घेतली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या आंदोलनाला यश मिळाले असून.सर्व स्तरातून अध्यादेशाचे स्वागत केल्या जात आहे.

**अन्नत्याग आंदोलन तूर्तास स्थगित**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने मागील १६नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्र्यांना पत्रकारांच्या नावाची नोंद (अधिस्वीकृती) मध्ये तसेच विविध मागण्यांचे निवेदन दिले होते.सदर निवेदनाची गांभिर्याने दखल घेत हिवाळी अधिवेषण सुरू होण्या पूर्वीच शासनाच्या वतीने अध्यादेश काढून सकारात्मक पाऊल उचलल्यामुळे संघटनेच्या वतीने करण्यात येत असलेले अन्नत्याग आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.सदर मागणिकरिता संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष देविदास सूर्यवंशी(मामा),शोएब खान,डॉ अली असगर दवावाला,मोहित भोजवानी,उज्वल भालेकर, स्वप्नील सवाळे,सागर डोंगरे,सागर तायडे,अनिरुद्ध उगले,अजय श्रृंगारे, दिलीप जवंजाळ,महिला जिल्हाध्यक्ष मीनाक्षी कोल्हे,सुरुची बनगैया,पुष्पा जैन,प्रविण झोलेकर, संघटक अब्दुल रफिक,समीर अहमद,विजय गायकवाड,प्रशांत सुने,संजय मोहोड,गजानन जीरापुरे, पी.एन. देशमुख, निशांत ओगले,सुरज डहाट, प्रशिक मकेश्वर,अवकाश बोरसे,राजरत्न मोटघरे, शुभम मेश्राम सहित जिल्हाभरातील तमाम पत्रकारांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला.

# डॉ. श्यामा घोणसे, दत्ता जोशी, डॉ. राजेंद्र नाईकवाडे व किरण डोंगरदिवे यांना संस्कार भारती वायय पुरस्कार : ३१ डिसेंबरला अमरावतीत होणार पुरस्काराचे वितरण






**दि.१३ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

रंगमंच व ललित कलांच्या संवर्धनार्थ कार्यरत विदर्भ संस्कार भारतीच्या वतीने वर्ष २०२१ व २०२२ करिता दिल्या जाणारा 'स्व. डॉ. कल्पना व्यवहारे स्मृती उत्कृष्ट वायय पुरस्कार' डॉ. श्यामा घोणसे (पुणे), दत्ता जोशी (छत्रपती संभाजी नगर), डॉ. राजेंद्र नाईकवाडे (नागपूर) आणि किरण डोंगरदिवे (मेहकर जि. बुलढाणा) यांना घोषित झाला आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिह्न आणि रोख १५,००० रुपये असे स्वरूप असलेला, दरवर्षी दिला जाणारा हा पुरस्कार यावेळीदेखील विभागून देण्यात येत आहे.

डॉ. श्यामा घोणसे लिखित 'भारतीय संत आणि सामाजिक समरसता' (वैचारिक, भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे), दत्ता जोशी लिखित 'तुम्ही बी घडा ना' (प्रेरक, पोलाद उद्यमिता प्रतिष्ठान, जालना), डॉ. राजेंद्र नाईकवाडे लिखित 'शब्दनिष्ठांची मांदियाळी' (विमर्शात्मक वाययीन व्यक्तिचित्रे, लाखे प्रकाशन, नागपूर) आणि किरण शिवहर डोंगरदिवे लिखित 'काव्यप्रदेशातील स्त्री' (समीक्षात्मक, अथर्व पब्लिशन) या पुस्तकांची निवड गत दोन वर्षीच्या पुरस्कारांसाठी करण्यात आली आहे.

डॉ. कल्पना व्यवहारे उमरेडच्या कला -वाणिज्य महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापक होत्या. व्यासंगी, वैचारिक व ललित लेखक म्हणून त्या परिचित होत्या. त्यांच्या स्मृत्यर्थ त्यांच्या सुकन्या वैशाली देशपांडे व दीपाली एकताटे यांनी दिलेल्या देणगीतून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यापूर्वी शेषराव मोरे, अदिती जोगळेकर-हर्डीकर, सुरेंद्र दरेकर, माधव भांडारी, देवीदास पोटे व अहमद शेख हे या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

पुरस्कारप्राप्तांचा परिचय:डॉ. श्यामा घोणसे पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख होत्या. 'वीरशैवांचे मराठी- हिंदी वायय : एक अभ्यास' विषयावर त्यांचा प्रबंध आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र प्रांताच्या अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास मंडळाच्या नियामक मंडळ सदस्य, शासनाच्या महात्मा फुले चरित्र साधन समितीच्या सचिव राहिल्या आहेत.

'भारतीय संत आणि सामाजिक समरसता' या ग्रंथामध्ये संतांच्या चमत्कारांपेक्षा त्यांनी जातिभेद निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न आणि इस्लामविरुद्ध उभे केलेले जनमानस याचा प्रामुख्याने विचार केलेला आहे. केरळ ते काश्मीर आणि आसाम पर्यंतच्या संतांचे यासंदर्भातील अपूर्व कार्य या ग्रंथात नोंदविलेले आहे.दत्ता जोशी हे छत्रपती संभाजीनगर स्थित मुक्त पत्रकार आहेत. तीन दशके प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात कार्यरत दत्ता जोशी उद्योजकीय प्रेरक लेखनाच्या निमित्ताने त्यांची राज्यभर भ्रमण करतात. त्यांनी एक हजारहून अधिक उद्योजकांच्या प्रेरक कथा समाजासमोर मांडल्या. त्यांची आजवर एकूण ४० पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

'तुम्ही बी घडा ना' या पुस्तकात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एकेकाळी अ. भा. विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता म्हणून काम केलेल्या आणि आता विविध क्षेत्रांतून योगदान देणाऱ्या २५ कार्यकर्त्यांचा वेध घेण्यात आला आहे. कार्यकर्ता व्यावसायिक झाला तरी त्याची राष्ट्रीय विचारांची व समर्पणाची भावना कायम राहते, हेच यातून अधोरेखित करण्याचा प्रयत्न आहे.प्रा. डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे हे श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर येथे मराठी विभागात कार्यरत आहेत. त्यांची आजवर समीक्षा विषयक ६ पुस्तके प्रकाशित असून १४ पुस्तकांचे त्यांनी संपादन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित मराठी विद्यापीठ समितीचे सदस्य, भाषा सल्लागार समिती सदस्य, विद्यापीठांतील अभ्यासक्रम समिती इत्यादी विविध समित्यांवर कार्यरत डॉ. नाईकवाडे समरसता साहित्य परिषदेसह विविध संस्था संघटनांचे पदाधिकारी आहेत.

'शब्दनिष्ठांची मांदियाळी' या ग्रंथातून मराठी साहित्यात मानदंड ठरलेल्या निवडक लेखकांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा आणि साहित्याचा समग्र वेध घेतलेला आहे. विमर्शात्मक वाङ्मयीन व्यक्तिचित्रांचे स्वरूप लाभलेला आणि भारतीय सांस्कृतिक मूल्यांच्या प्रकाशात विविध साहित्यिकांच्या समग्र साहित्याची मूलगामी चिकित्सा करणारा हा ग्रंथ मराठी समीक्षेच्या क्षेत्रात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीने उठून दिसतो.

किरण शिवहर डोंगरदिवे हे नव्वदी नंतच्या साहित्यिक पिढीचे प्रतिनिधी असून त्यांचे काव्य, ललित, वैचारिक लेखनासह कथा आणि समीक्षणाच्या क्षेत्रात भरीव कार्य असून अनेक प्रतिष्ठित साहित्य पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.'काव्यप्रदेशातील स्त्री' ह्या समीक्षा संग्रहात ७६ कवींच्या कवितेतील फक्त स्त्री विषयक जाणिवावर लेखन करत त्यांनी संबंधित कवी, त्यांचा काव्य अवकाश, तत्कालीन सामाजिक स्थितीत स्त्रियांना मिळणारी वागणूक आणि स्त्री विषयक समाज मन आपल्या लेखनातून अधोरेखित केले असून असा प्रयोग मराठीतच नव्हे तर इतर भाषेतही झाल्याचे आढळून येत नाही.पुरस्कार प्राप्त सर्व मान्यवरांचे विदर्भ संस्कार भारतीच्या अध्यक्ष सूरमणी प्रा. सौ. कमल भोंडे, कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर, महामंत्री विवेक कवठेकर व अ. भा. साहित्य विधा संयोजक आशुतोष अडोणी यांनी अभिनंदन केले आहे.

# तुरीच्या शेतात गांजाची लागवड, कडाक्याच्या थंडीत झाडांची मोजणी

## कारवाई करताना अधिकारी, कर्मच्यारीही चक्रावले



**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

लोणार तालुक्यातील हत्ता शिवारातील शेतामध्ये गांजाची झाडे लावली असल्याची धक्कादायक बाब उघड झाली. मंगळवारी रात्री सुरू झालेली ही कारवाई आज बुधवारी सकाळीदेखील सुरू असून गांजाची शेकडो झाडे आढळून आली आहे. झाडांची मोजणी झाल्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अनिल चव्हाण असे गांजाची समांतर शेती करणाऱ्या बहाद्दर शेतकऱ्याचे नाव आहे. त्याने लोणार तालुक्यातील हत्ता शिवारमधील गट १८१ मध्ये हा प्रयोग केला. याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा घातला. मेहकरचे एसडीपीओ प्रदीप पाटील, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनात काल रात्री कारवाई सुरू झाली.अंधारामुळे धीम्या गतीने, मात्र रात्रभर ही कारवाई सुरू राहिली. झाडांची संख्या शेकडोच्या संख्येत असल्याने बॅटरीच्या मंद उजेडात झाडांची मोजणी करण्यात आली. कडाक्याच्या थंडीत पथकातील कर्मचारी रात्रभर शेतात तळ ठोकून राहिले. आज बुधवारी सकाळी देखील कारवाई सुरूच होती. कार्यवाहीनंतर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. पोलिसांनी अनिल चव्हाण याला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे.

# कजबेगव्हाण शेतशिवारात भल्यामोठ्या अजगरानं शेळी गिळली

## सर्पमित्रांनी शेपटी धरली चौदा फुटी अजगराला अख्खी शेळी ओकायला लावली



**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी**

अजगर खूप धोकादायक प्राणी आहे हे सर्वांनाच माहितीय. त्याच्या हल्ल्यात वाचणं खूप कठिण आहे. त्यामुळे लोकही या भयानक प्राण्याला घाबरतात. त्याला पाहूनच भल्याभल्यांना घाम फुटतो. अजगराच्या हल्ल्याचे अनेक घटना समोर येत असतात. अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे, ज्याला ऐकूनच तुमच्याही अंगावर काटा येईल.अजगराने एका शेळीला गिळल्याची घटना समोर आलीय. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली. एवढी मोठी शेळी खाल्ल्यानं अजगराला साधं रेंगाळताही येत नव्हतं. सध्या ही घटना मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरत आहे.अंजनगाव तालुक्यातील कजबेगव्हाण मध्ये एका अजगराने शेळीवर हल्ला करत पूर्ण शेळीच गिळंकृत केल्याची घटना घडली आहे. तालुक्यातील कजबेगव्हाण या गावाच्या शिवारातील ही घटना आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे.अमोल दामले हा शेळीपालन शेतकरी नेहमीप्रमाणे आपल्या शेळ्या चारण्यासाठी गावाच्या अगदी जवळ असलेल्या किसनदास सावळे यांच्या शेता जवळ असलेल्या नाल्याकाठी शेतशिवारात गेला होता. त्यांच्या शेळ्यांच्या कळपावर जंगलात असलेल्या एका भल्या मोठ्या १४ फुट लांबीच्या अजगराने झडप घातली. अजगराच्या झडपेत कळपातील एक शेळी सापडली. शेळीवर हल्ला करत शेळीला गिळण्याचा प्रयत्न या अजगराने केला. या अजगराच्या तावडीत आपली शेळी सापडल्याचे अमोल दामले या शेळीपालन शेतकऱ्याच्या निदर्शनास आले.या परिसरात झाडाझुडूपांची संख्या मोठी असल्याने अजगरासारखे प्राणी या जंगलात वास्तव्यास आहेत. दरम्यान अमोल दामले यांनी सर्पमित्राला या घटनेची माहिती दिली. सर्पमित्र घटनेच्या ठिकाणी पोहचेपर्यंत अजगराने संपूर्ण शेळीच गिळंकृत केली होती. सर्पमित्र बंटी इंगळे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी या अजगराला पकडले. या १४ फुटाच्या अजगराला सुरक्षितरित्या पकडून जंगलात नेऊन सोडण्यात आले.सर्पमित्रांनी अजगराची शेपटी धरली. अजगर शेळीला गिळून झुडूपात जात असताना सर्पमित्रांनी त्याची शेपटी धरली आणि मागे ओढली. सर्पमित्रांनी शेपटी धरताच अजगरानं गिळलेली शेळी बाहेर काढण्यास सुरुवात केली. हळूहळू अजगराच्या पोटातून संपूर्ण शेळी बाहेर आली. त्यानंतर सर्पमित्रांनी अजगराला सुरक्षित पकडून जंगलात सोडून दिले.

# शासनाला बेरोजगारांची फौज निर्माण करायची आहे का?



**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यात गेल्या दहा वर्षांपासून दीड लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने नोंदणी न केल्यामुळे बेरोजगार आहेत तर सरकार दुसरीकडे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कमी करण्याच्या तयारीत आहे. राज्य शासन बेरोजगारांची राज्यात बेरोजगारांची फौज निर्माण करू पाहते आहे का? या सर्वांना कधी न्याय देणार असा खडा सवाल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.

राज्यात २०१४ पासून आतापर्यंत सुमारे दीड लाखापेक्षा अधिक वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. मात्र राज्य पॅरामेडिकल कौन्सिलने अद्याप या विद्यार्थ्यांची नोंदणी देखिल केलेली नाही, त्यामुळे हे हजारो विद्यार्थी बेरोजगार झाले आहेत, असा आरोप काँग्रेसच्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी लक्षवेधी दरम्यान सभागृहात केला. राज्यातील अनेक महाविद्यालय ही महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल च्या माध्यमातून नोंदणीकृत नाहीत शासकीय सेवेमध्ये काम करताना वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी होणे अत्यंत गरजेचे असते मात्र ही नोंदणी अद्यापही ठप्पच आहे. यापैकी अनेक विद्यार्थी जेव्हा नोंदणीसाठी पॅरामेडिकल कौन्सिलला दूरध्वनीद्वारे संपर्क साधतात, तेव्हा महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल कडून विद्यार्थ्यांचे फोनही घेतले जात नाहीत, त्यामुळे सर्व विद्यार्थी त्रस्त आणि हवालदिल झाले आहेत. जोपर्यंत या विद्यार्थ्यांची नोंदणी अधिकृतरित्या होत नाही तोपर्यंत त्यांना रोजगार मिळणार नाही. असे हजारो विद्यार्थी आज रोजगाराविना ताटकळत आहेत तर दुसरीकडे राज्य सरकार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जे कंत्राटी कामगार नेमले गेले आहेत त्यांना सुद्धा कमी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळते आहे. राज्य सरकारला राज्यात बेरोजगारांची फौज या निमित्ताने निर्माण करायची आहे का? असा सवाल ड. ठाकूर यांनी विधानसभेत केला. राज्यातील या बेरोजगार युवकांच्या प्रश्नांना न्याय द्यायचा असेल, तर सरकारने ताबडतोब पॅरामेडिकल विद्यार्थ्यांच्या नोंदणीला सुरुवात केली पाहिजे. तसेच राज्य सरकारच्या समन्वयाचा अभावाचा फटका या विद्यार्थ्यांना बसतो आहे. राज्य सरकारच्या उच्च आणि तंत्रशिक्षण वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य या तीनही विभागांनी एकत्र बैठक घेऊन या विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर ताबडतोब तोडगा काढावा, अशी मागणी ड. ठाकूर यांनी यावेळी केली. या संदर्भात उत्तर देताना राज्याचे आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांनी लवकरात लवकर यावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही सभागृहात दिली.

# 'यलो मोझॅक'मुळे सोयाबीनचे उत्पादन घटले, ४९ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांना फटका



**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अकोला**

'यलो मोझॅक' रोगाने सोयाबीन पिकांवर आक्रमण केल्याने त्याचा विपरीत परिणाम उत्पादनावर झाला आहे. यामुळे सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले. बाधित क्षेत्राचा सर्व्हे कृषी विभागाने केला असून जिल्ह्यातील चार तालुक्यांतील ४९ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र बाधित आढळले. 'यलो मोझॅक'च्या प्रादुर्भावामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा लागली आहे.

विदर्भातील सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. बहुतांश कोरडवाहू शेतकरी वर्ग सोयाबीनचे उत्पादन घेण्याकडे वळला आहे. खरीप हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक'चा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांपुढे नवी अडचण निर्माण झाली. 'यलो मोझॅक' रोगाचा सोयाबीन पिकावर प्रचंड दुष्परिणाम झाला. या विषाणूजन्य रोगामुळे पीक पिवळे पडून करपले होते. या सर्वांचा परिणाम उत्पादनावर झाला. उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली.'यलो मोझॅक' हा विषाणूजन्य रोग आणि खोडकूज व मूळकूज या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या क्षेत्राचे तलाठी ग्रामसेवक, कृषी सहायक यांच्यामार्फत पंचनामे करण्याचे लेखी आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. त्यानुसार नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे केले असता ४९ हजार हेक्टरवरील क्षेत्र बाधित आढळून आले आहे. जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात 'यलो मोझॅक' रोगामुळे सर्वाधिक २२ हजार ४५६ हेक्टर सोयाबीन पिकाचे नुकसान झाले. त्या खालोखाल बार्शीटाकळी तालुक्यात १२ हजार १४५, पातूर ११ हजार ३०२ व बाळापूर तालुक्यात तीन हजार ५०८ हेक्टर पिकांचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यामध्ये आढळून आले आहे. याचा अंतिम अहवाल शासनाकडे सादर केला जाणार आहे. नुकसानग्रस्त शेतकरी संकटात असून त्यांना मदत केव्हा मिळते, याकडे लक्ष लागले आहे.

# ओबिसी आरक्षण बचाव महा एल्गार सभा अमरावतीत २४ डिसेंबरला

## ओबीसी योध्दा ना. छगनराव भुजबळ राहणार उपस्थित




**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ओबिसी विमुक्त, भटके समाजाचे घटनेनुसार प्राप्त झालेले संविधानात्मक आरक्षण टिकविण्यासाठी पश्चिम विदर्भातील पहिली ओबिसी आरक्षण बचाव महा एल्गार सभा अमरावती मधील बडनेरा रोडवरील दसरा मैदानात रविवार, दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी, सकाळी ११:०० वा. सकल ओबिसी, भटके विमुक्त बारा बलुतेदार समाज जिल्हा अमरावती यांचे वतीने आयोजित करण्यात आलेली आहे. ओबिसींच्या जनजागृतीसाठी ओबिसी रथाव्दारे जिल्ह्यात प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे.

या भव्य एल्गार सभेला ओबिसी संघर्ष योध्दा तथा ओबिसीचे हृदयसम्राट ना. छगनराव भुजबळ साहेब मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून मा. प्रकाशअण्णा शेंडगे, माजी मंत्री मा. महादेवराव जानकर, मा. खासदार रामदास तडस, मा. आमदार गोपीचंद पडळकर, डॉ. बबनराव तायवाडे, मुस्लिम नेते शब्बीर अंन्सारी, भटके विमुक्त नेते प्रा. लक्ष्मणराव गायकवाड, बहुजन नेते ॲड. दिलीप एडतकर व अन्य मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.आज ओबिसी आरक्षणामधून मराठा समाजाने मागच्या दाराने सरसकट कुणबी प्रमाणपत्र प्राप्त करून आरक्षण मागितल्यामुळे ओबिसींचे आरक्षण धोक्यात आले आहे. त्यांना ओबिसी कोट्यातून आरक्षण देण्यात येऊ नये यासाठी ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात भव्य ओबिसी आरक्षण बचाव महा एल्गार सभेचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणाविरूध्द ओबिसी समाज आता आक्रमक झाला असून ओबिसींचे अस्तित्व अबाधित ठेवून नविन पिढीच्या भवितव्यासाठी लाखोच्या संख्येने ओबिसी भटके विमुक्त समाजाने अमरावती येथील महा एल्गार सभेकरीता उपस्थित राहण्याचे आव्हान सकल ओबिसी भटके विमुक्त व बारा बलुतेदार समाजाच्या वतीने करण्यात येत आहे.

पत्र परिषदेकरीता डॉ. गणेश खारकर, इंजि. वासुदेराव चौधरी, रावसाहेब हाडोळे, ॲड. बाबुराव बेलसरे, विपुल नाथे, प्रविण पेटकर, ॲड. नंदेश अंबाडकर, प्रभाकर वानखडे, सुयश श्रीखंडे, तेली समाजाचे संजय हिंगासपूरे, श्रीकृष्ण माहोरे, कुंभार समाजाचे डॉ. श्रीराम कोल्हे, ॲड. गजानन तांबटकर, धनगर समाजाचे ॲड. विश्वास काळे, इंजि. सुभाष गोहत्रे, भोई समाजाचे उमेश ढोणे, खाटीक समाजाचे प्रकाश खंडारे, शिंपी समाजाचे सुरेश बढासे, भास्कर टोंपे, सोनार समाजाचे ज्ञानेश्वर कुर्वे, ठाकुर समाजा तर्फे जयश्री ठाकुर, सुतार समाजा तर्फे माधव राऊत, सुरेश बेलणकर, चांभार समाजाचे अनिल भाग्वतकार उपविले. संजय नागोणे कविताताई कांडे,श्रीकृष्ण बनसोड ओमप्रकाश अवाडकर,उपस्थित होते.